# पुनर्विवाहाच्या प्रचारार्थ आजपर्यंत झालेला उद्योग व त्याचें फल.

१. आमच्या देशांत कित्येक वरिष्ठ ज्ञातींत स्त्रियांचा पुनर्विवाह करण्याची चाल नाहीं. ही चाल पडणें फार अवश्यक आहे असें देशांतील कित्येक सुज्ञ लोकांस दिसून त्यांणीं ती पाडण्याकरितां बरेच श्रम केले व त्या मानानें त्या श्रमांस फलही आलें आहे. मूळ यत्न झाल्यास आज बरीच वर्षें होऊन गेलीं. हल्लींच्या नव्या पिढीस तर पुनर्विवाहाच्या प्रचारार्थ झालेले पहिले उद्योग हे ऐतिहासिक भाग होऊन गेले आहेत. आज ज्यांचीं वयें ३० वर्षांपर्यंत आहेत त्यांस त्या उद्योगाविषयीं प्रत्यक्ष माहिती असण्याचा मुळींच संभव नाहीं. यामुळें या बाबतींत काय काय यत्न झाले हें ह्या नवीन मंडळीस समजणें कठीण आहे. मागील पिढीच्या मंडळीच्या तोंडून व कांहीं पुस्तकांच्या आधारानें कोणी मिळविल्यास कांहीं माहिती मिळण्यासारखी आहे. पण इतके श्रम फारसे कोणी करीत नाहीं, व पुष्कळ गोष्टींचे लेख आतां मिळण्यासारखे नाहींत. इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, इत्यादि वर्तमानपत्रांचीं जुनीं फाइलें जो कोणी पहाण्याचा यत्न करील त्यास बरीच माहिती लागेल. पण हा मार्गही सुलभ नाहीं. यामुळें लोकांत या बाबतींत माहिती नाहींशी झाली आहे, किंवा भलतीच माहिती कानांवर येऊन गैर समजूत वाढत चालली आहे. याकरितां आजपर्यंत या बाबतींत काय काय यत्न झाले व त्यास फल काय मिळालें हें एथें थोडक्यांत दाखविण्याचा आह्मीं विचार केला आहे. आह्मीं जी माहिती देणार ती अगदीं कच्ची हकीकत देणार असें नाहीं. तसें करूं गेल्यास एक निराळें मोठें पुस्तक होईल. आह्मीं अगदीं संक्षिप्त माहिती देणार. हिच्यापासून सर्व हकीगत कळण्यास जरी मार्ग होणार नाहीं, तरी साधारण अटकळ करण्यास जागा होईल. ह्या उद्योगास प्रारंभ प्रथम बंगाल देशांत झाला आहे. पण आह्मीं जी विशेष हकीगत देणार ती आमच्या या प्रांतापुरती आहे. कारण तिचाच आह्मांस अधिक उपयोग आहे. या प्रांतांतलि अलीकडची बहुतेक हकीगत आमच्या स्वतःच्या स्मरणांत आहे. या गोष्टीची चर्चा

वर्तमानपत्रांत विशेष जारीनें सुरू झाली तेव्हांपासून काय काय झालें, तें आह्मीं चांगलें लक्ष्य लावून पाहिलेलें आहे व पुष्कळ गोष्टी आह्मांस अगदीं डोळ्यापुढें दिसत आहेत. आह्मीं जी माहिती देत आहों तींत पुस्तकांच्या किंवा इतर गृहस्थांच्या सांगण्यावरून घेतलेला असा भाग कमी येईल. बहुतेक भाग आमच्या स्वतःच्या माहितीनें लिहिणार आहों.

२ स्त्रीचा एक पति मृत झाला असतां तिणें दुसरा करावा किंवा नाहीं, हा प्रश्न नुसत्या व्यावहारिक दृष्टीनें पाहतां इतका सुलभ आहे कीं त्याचें उत्तर देण्यास कोणासही कठीण पडावयाचें नाहीं. एक घर पडलें किंवा जळून गेलें तर दुसरें बांधावें किंवा नाहीं, एक वस्त्र हरवेंलें तर दुसरें घ्यावें कां नाहीं, एक धंदा आरंभिलेला निर्फळ झाला तर दुसरा करावा किंवा नाहीं, ह्या प्रश्नांचा जसा कधींच कोणास विशेष विचार करावा लागत नाहीं, त्यांचीं उत्तरें जशीं "होय" अशीं सहज येतात, तसेंच वरील प्रश्नाचें उत्तर आहे. ह्या गोष्टीचा स्पष्टपणा पुरुषांच्या पुनर्विवाहाची व बहुतेक लोकांत स्त्रियांच्याही पुनर्विवाहाची चाल विनतक्रार चालू आहे यावरून होतो. पुरुषाची एक स्त्री मृत झाली असतां त्याणें दुसरी करावी किंवा नाहीं ही शंका आज कोणत्याही लोकांच्या स्वप्नांत सुद्धां येत नाहीं. आमच्या लोकांत तर एक स्त्री जीवंत असतां दुसरी एक नाहीं तर पाहिजे तितक्या करण्याची सध्यां मोकळीक आहे. मग एक मृत झाल्यावर दुसरी करावी किंवा नाहीं ही शंकाच नको. स्त्रीनेंही एक पति मृत झाला असतां दुसरा करण्याची चाल पृथ्वीवर सर्वत्र आहे. काय प्रतिबंध आहे तो आह्मां हिंदु लोकांतील कांहीं जातींत मात्र आहे. पुनः हा प्रतिबंधही अनादि काळापासून चालत आला आहे असें नाहीं. ब्राह्मणादि जातींतीलही स्त्रियांनीं पुनर्विवाह करावा असा विचार पूर्वकाळीं लोकांत होता ही गोष्ट पूर्वींच्या ग्रंथांवरून अगदीं स्पष्ट दिसते.

३. पण ही गोष्ट इतकी विचाराच्या दृष्टीनें सुलभ असतां ती आज रूढींत नसल्यामुळें ती प्रचारांत आणण्याचें काम फारच कठीण झालें आहे. ह्या गोष्टीचा उद्योग आज कित्येक दिवस चालला आहे तरी या विषयीं लोकांच्या मनांत भरलेले ग्रह अद्यापि

बदलत नाहींत. जी गोष्ट आजपर्यंत चालू नाहीं, ती आपण कशी करावी? शास्त्रांस सोडून कसें वागावें, अशा शंका लोकांच्या मनांत भरलेल्या आहेत. पण जुनी चालत आलेली चाल एका बाजूस ठेवून स्वतंत्रपणें जर कोणी विचार करावयास लागला तर स्त्रियांच्या पुनर्विवाहाची अवश्यकता आहे ही गोष्ट समजण्यास फार कठीण जातें असें नाहीं. ज्या कोणा दुर्दैवी आईबापांच्या नशिबीं आपल्या डोळ्यांनीं वैधव्य दुःखांत पडलेली आपली तरुण कन्या पाहण्याचें येतें, त्यांस ही स्त्रीपुनर्विवाहाची चाल चालू होईल तर फार बरें होईल असें सहज वांटतें. पण कोणा एका दुष्ट वेळेवर ह्या गोष्टीचा प्रतिबंध झाला आहे व तो लोकांत इतका खिळून गेला आहे कीं, तो नाहींसा व्हावा असें तोंडानें उघड रीतीनें ह्मणण्यासही लोकांस लाज वाटते. आपण असें ह्मटलें तर आपल्यास लोक धर्मभ्रष्ट ह्मणतील ह्या भीतीनें मनांत सहज उमजण्यासारखी गोष्ट लोकांच्यानें तोंडाबाहेर काढवत नाहीं. आपण ज्याच्याशीं बोलत आहों तोही आपल्याच मताचा आहे अशी जेव्हां खात्री होते तेव्हां मात्र कित्येक लोक मागून हळूच बोलून दाखवितात कीं " अहो पुनर्विवाह करूं नये असें ह्मणावयाचें याचें कारण इतकेंच कीं लोकलज्जा. एरवीं ही चाल चालू होईल तर किती तरी अनाथ गाई चिखलांतून बाहेर काढल्यासारखें होईल? पण ही चाल पडावी कशी हीच मोठी पंचाईत आहे. " अशा तऱ्हेचे उद्गार आह्मीं कित्येक वेळां अगदीं वृद्ध वृद्ध अशा जुन्या समजुतीच्या पुरुषांच्या व स्त्रियांच्या तोंडून ऐकिले आहेत.

४. पुनर्विवाहाचा प्रचार पाडूं इच्छिणाऱ्या लोकांचें पहिलें काम हें होतें कीं ह्या चालीची अवश्यकता किती आहे हें लोकांच्या नजरेपुढें आणावें. ह्या पहिल्या कामाचें बीजारोपण सुमारें ९०।६० वर्षांपूर्वीं झालें असावें असें दिसतें. ही चाल पाडण्याच्या प्रत्यक्ष यत्नाची प्रथम गोष्टच नको. नुसती ही चाल नाहीं हें वाईट आहे; असती तर चांगलें झालें असतें, इतकेच उद्गार लोकांत प्रथम हळु हळु निघूं लागले. ह्या गोष्टीस विशेष कारण अर्थात् इंग्रजी विद्या व इंग्लिश लोकांचा सहवास, हें असावें. त्यांतही ह्या गोष्टी प्रथम ख्रिस्ती मिशनरींकडून विशेषतः निघाल्या असाव्या.

१. ह्या विषयाची विशेष चर्चा मागें सांगितल्याप्रमाणें प्रथम बंगा प्रांतीं ह्या कार्याचें कंकण तेव्हांपासून अद्यापपर्यंत हातीं बांधून बसलें गृहस्थ प्रसिद्ध **ईश्वरचंद्र विद्यासागर** ह्या महात्मा पुरुषानें सुरू केलं पुनर्विवाहाची चाल पडणें इष्ट आहे इतकेंच नाहीं, तर ही गोष्ट शा संमत आहे असें त्यांणीं प्रतिपादन करून त्यावर " विधवाविवाह " ह णून बंगाली भाषेंत शास्त्रांतील आधारासह ग्रंथ लिहीला आणि ह गोष्टीची चर्चा त्या काळच्या पुढारी मंडळींत पुष्कळच वाढवून ती स कारापर्यंत नेऊन सन १८५६ सालीं त्या सालचा १५ वा आक्ट ह्मणू स्त्रियांचा पुनर्विवाह शास्त्रसंमत असून अशा विवाहापासून झालेली संतं सरकार कायदेशीर संतति समजेल असा कायदाही हिंदुस्थान स कारच्या कायदेकौन्सिलानें पास केला. ही ह्या कार्याच्या इतिहास तली ध्यानांत ठेवण्यासारखी मुख्य गोष्ट होय. युरोपिअन लोकांस पुन र्विवाहास हिंदु शास्त्र अनुकुल आहे हें समजावें ह्मणून पंडित ईश्वरचं यांणीं आपल्या पुस्तकाचें इंग्रेजींत भाषांतर केलें. सरकारास एकट्य **ईश्वरचंद्रांच्या** शास्त्राधारावर कायदा करितां येईना म्हणून सरकारा काशीच्या पंडितांचा अभिप्राय आणला व तो पुनर्विवाहास अनुकू असा पडला तेव्हां सरकारानें कायदा केला. पंडित ईश्वरचंद्र एवढें करून राहिले नाहींत. पुनर्विवाहाचा प्रचार पडावा ह्मणून त्यांणीं खटप चालविली. लोकांत उदाहरण व्हावें ह्मणून त्यांणीं आपल्या स्वतःच्य पुत्राचा एका विधवेबरोबर विवाह केला. इतर लोकांसही उत्तेजन देऊ कांहीं पुनर्विवाह केले व ह्या कामीं पुष्कळ पैसा खर्च केला. पण या तसें यश विद्यासागरांच्या यत्नास आलें नाहीं. जी मंडळी विद्यासागरां तोंडानें साहाय्य करावयास सिद्ध होती तिणें कृतीच्या भागांत त्यांस अ गदीं फसविलें. ईश्वरचंद्र यांची सरकारी अम्मलदारांत चांगली मान्यत होती व अद्यापि आहे ह्मणून तरुण सुशिक्षित ह्मणविणाऱ्या मंडळींनी त्यांजकडे जाऊन चाकरीकरितां शिफारस पत्रें मागावीं व तेवढ्या पुरतें पुनर्विवाहाचे आपण कैवारी आहों असें दाखवावें, पण नौकरीची कार्य- सिद्धि झाली कीं पुनः तोंडही दाखवूं नये! स्वतः विद्यासागर यांचें संस्कृत कालेज आहे त्यांतही नौकऱ्या मिळविण्याकरितां तोंडापुरता पुन- र्विवाहपक्षाचा कळवळा दाखवावा पण त्यांत जीव मुळींच नसावा; अशा

रीतीनें सर्व सुशिक्षित तरुणांविषयीं विद्यासागर* यांचें मन अगदीं बदलून गेलें आहे.

६. ज्या लोकांस नुसती इंग्रेजी विद्या आली पण आपलें कर्तव्य बजावण्याची जबाबदारी समजण्यासारखें शिक्षण ज्यांस मिळालें नाहीं त्यांच्या विद्येचा परिणाम असाच व्हावयाचा. इंग्रेजी शिकलेल्या तरुणांच्या कडून जरी बंगाल्यांत या कामास साधारणतः साहाय्य मिळालें नाहीं, तरी तिकडे ब्राह्मसमाजाचा बराच प्रसार झालेला असल्यामुळें पुष्कळ ब्राह्म तरुणांनीं या कामास साहाय्य करणें आपलें कर्तव्य समजून विधवांशीं लग्नें केलीं आहेत. जे केवळ नांवाचे ब्राह्म आहेत ते मात्र आपल्या इतर तरुण मित्रांच्याच पंक्तीस बसले आहेत. ह्या बंगाल प्रांतीं विधवाविवाहाचें व ब्राह्मसमाजाचें कार्य बरोबरच वाढत आहे.

७. ह्या प्रांतीं पुनर्विवाहाचा विचार अलीकडे पुनः केव्हां उपस्थित झाला असावा याचा शोध करितां आह्मांस एक सन १८४१ सालीं ह्या विषयावर लिहिलेलें लहानसें पुस्तक आढळलें. हें आमच्या नेटिव ख्रिस्ती मंडळींतील विद्वान व प्रचंड ग्रंथकर्ते रेव. बाबा पदमनजी यांच्या संग्रहास होतें. बाबासाहेबांनीं स्वतः " कुटुंब सुधारणा " नांवाचें पुस्तक लिहिल्याचें आमच्या लहानपणीं आह्मी ऐकिलें होतें. हें पुस्तक

---

*सहा वर्षांपूर्वीं सुदैवानें आम्हांस कलकत्यास पंडित ईश्वरचंद्र विद्यासागराच्या समक्ष भेटीचा लाभ प्राप्त झाला होता. त्या वेळीं बंगाली तरुणांविषयीं त्यांणीं ही हकीकत आम्हांस स्वमुखानेंच सांगितली. आम्हा मुंबईकरांविषयींही त्यांचा अभिप्राय ऐकण्यास मिळाला. मुंबईकडच्या मंडळीनीं जेव्हां हें काम हातांत घेतलें तेव्हां बंगाली लोकांत धैर्यच नाहीं ह्मणून पुनर्विवाहाचें काम तिकडे उदयास आलें नाहीं, पण आतां मुंबईकडच्या शूर मराठ्यांनीं हें काम उचललें आहे तेव्हां ते हटकून सिद्धीस नेतील असें विद्यासागरांस वाटलें. पण आमचीही स्थिति जेव्हां त्यांच्या सारखीच अनुभवास आली तेव्हां बंगाली लोकांविषयीं जो ग्रह त्यांचा झाला होता तोच त्यांणीं सर्व हिंदुस्थानास लागू केला होता. आमच्या भेटीच्या वेळीं मद्रासेकडे या कामीं विशेष चळवळ दिसत होती व तिला यश यावें अशी जरी ईश्वरचंद्रांची साहाजिक इच्छा होती तरी त्यांस दोन इलाख्यांच्या अनुभवावरून मद्रासकरांचीही फारशी आशा नव्हती व शेवटीं अनुभव तसाच आला म्हणावयाचा. त्यावेळाप्रमाणें हल्लीं मद्रासेकडे उद्योग चाललेला दिसत नाहीं.

पहाण्यास मिळेल तर बघावें ह्मणून खुद्द ग्रंथकारांकडे आह्मी गेलों
सतां तें पुस्तक तर मिळालें नाहीं पण वरील पुस्तकाची खबर लाग
हें पुस्तक किंवा निबंध कोणी एका जुन्या तऱ्हेच्या शास्त्रीबावांनीं लि
लेला असावा असें त्याच्या भाषेवरून दिसतें. पुस्तकावर कर्त्याचें
नाहीं. निबंध लिहिणारांनीं तो एका गृहस्थाकडे पाठविला व त्यांणीं
छापून प्रसिद्ध केला. हा पोथीच्या आकाराचा शिळा छापावर छापले
आहे. हा जुना लेख आमच्या वाचकांच्या संग्रहास असावा ह्मणून
आह्मीं शेवटीं पुरवणीच्या रूपानें ह्या निबंधास जोडला आहे. या जु
छापील निबंधाच्या प्रस्तावनेंत पुनर्विवाहाच्या चर्चेबद्दल पूर्वीची माहि
सांगताना सवाई जयसिंगाचे वेळीं व पेशवाईंत परशुरामभाऊ पटव
यांच्या गतभर्तृका कन्येच्या पुनर्विवाहाच्या संबंधानें विचार होऊन पु
र्विवाहास शास्त्राधार असल्याचें ठरल्याविषयीं उल्लेख करून आलीक
ह्मणजे सन १८३७ सालीं एक तैलंग ब्राह्मण व परशुराम क्षेत्रस्थ
ब्राह्मण ह्यांणीं मिळून एक पुस्तक लिहून तें मुंबईंत छापल्याचें सांगित
आहे. या ३७ सालच्या पुस्तकावर "मुंबई दर्पण" नामक त्या वेळच
व बहुधा वर्त्तमान पत्रांत निरनिराळ्या साधक बाधक टीका आल्या.
पाहून एका मध्यस्थानें आणखी एक ग्रंथ लिहिला, पण तो छापून
सिद्ध झाला नाहीं. त्याच्या लेखी प्रती करून कित्येक धर्मशास्त्री व
यांजकडे पाठविल्या असें लिहिलें आहे. यावरून अलीकडच्या का
सुद्धां ६० वर्षांवर ह्या गोष्टीची चर्चा चालू झाली आहे असें दिसतें.
बाबा पदमनजी यांच्या "कुटुंब सुधारणा" यापुस्तकाशिवाय "यमु
पर्यटण" ह्मणून त्यांणीं एक याच विषयाच्या उत्तेजनार्थ लिहिलेलें पुस्त
प्रसिद्ध आहे. **रत्नप्रभा** ह्मणून जी एक कादंबरी मुक्तमाला कर्त्यांनीं लि
हिली होती, तींतही पुनर्विवाहास अनुकुल असा कथाभाग आणलेला आ

८. अशा रीतीनें प्रथम लोकांत हळू हळू या विषयाची चर्चा सुरू झा
होती तरी ती पुष्कळ वाढून ती प्रत्यक्ष फलद्रूप होण्यास विशेष उद्योग
ची अवश्यकता होती. तो उद्योग करण्यास प्रति पंडित ईश्वरचंद्र वि
द्यासागरच इकडे निर्माण व्हावयास पाहिजे होते. परमेश्वराच्या
मनांत हें कार्य पुढें यावें असें होतें ह्मणून प्रति विद्यासागर इकडे नि
र्माण झाले, ज्याच्या अविश्रांत श्रमानें व स्वतःच्या उदाहरणानें ज्यां

45

कीर्ति अजरामर होऊन राहिली आहे असे जे परलोकवासी **विष्णु परशुराम शास्त्री पंडित**, त्यांचें नांव कोणास सांगावयास नकोच. हे गृहस्थ पूर्व वयांत जुन्या पद्धतीप्रमाणें शास्त्राध्ययन करून पुढें पुणें एथील पाठशाळेंत इंग्रजी शिकले. नंतर कांहीं दिवस सरकारी चाकरींत होते पण ती परतंत्रतेची बिडी त्यांस सहन न होऊन त्यांणीं चाकरीचा राजीनामा देऊन मुंबईस येऊन वर्तमानपत्राचा व कांहीं व्यापाराचा असा धंदा ते करूं लागले. ह्यांस संस्कृत, इंग्रजी व मराठी या भाषांचें चांगलें ज्ञान होतें. बुद्धि तीक्ष्ण होती. हे गुण आज शेंकडो मंडळींत सांपडण्या सारखे आहेत, पण शास्त्री बोवांच्या हातून जें महत्कार्य झालें तें केवळ या गुणांनीं नव्हे, तर ज्या गुणांचीं हल्लींच्या बहुतेक विद्वानांत न्यूनता दिसून येते असे जे पक्का दृढनिश्चय व सतत उद्योग हे गुण शास्त्रीबोवांत उत्तम रीतीनें वसत होते. यामुळें त्यांणीं जें काम हातीं घेतलें तें आमरण सोडलें नाहीं. ज्या गोष्टींचें विचार हवेंत उगीच कोठें पसरत होते त्यांस सतत उद्योगानें निश्चित रूप देऊन त्यांचें प्रत्यक्ष फलही त्यांणीं पाहिलें. शास्त्रीबोवांच्या हयातींत ७ पुनर्विवाह झाले होते. त्यांस अकालीं मरण आलें, नाहीं तर आजपर्यंत ते जगते तर त्यांच्यापासून ह्या कार्यास पुष्कळ अधिक साहाय्य झालें असतें. असो. अधिक कार्यभाग व्हावयाचा तो जरी झाला नाहीं, तरी त्यांणीं आपला मुख्य भाग पुरा केला होता. नवीन कार्याची सर्व उभारणी करून काम सुरू करणें हेंच कठीण असतें. एथपर्यंत मजल आल्यावर पुढें काम अधिक उणें होणें हें केवळ अधिक उण्या श्रमांवर व काळावर अवलंबून असतें. असो. आतां शास्त्रीबोवांनीं उद्योग काय काय केले ते आपण पाहूं.

९.पुनर्विवाहाचा प्रचार पडणें हें युक्तीच्या दृष्टीनें किती जरी अवश्यक वाटलें तरी ह्या गोष्टीचा संबंध आमच्या लोकांच्या दृष्टीनें धर्माशीं फार असल्यामुळें विधवांचा पुनर्विवाह करणें हें शास्त्रसंमत आहे हें लोकांस दाखविणें हें पाहिलें काम होतें. हल्लींच्या कालमानानुरूप ज्या गोष्टींची अवश्यकता दिसेल त्यांस शास्त्राधार मिळेलच असा काय नियम आहे? शास्त्रांत त्याबद्दल कांहींच सांगितलें नसेल किंवा वेळेस उलटही सांगितलें असेल. पण ह्या पुनर्विवाहाच्या बाबतींत दैवयोगानें तसा प्रकार न होतां पूर्वीच्या शास्त्रकर्त्याऋषींच्या मनांत विधवांनीं पुनः विवाह

करावा किंवा नाहीं हा प्रश्न साहजिकपणें येऊन त्यांणीं तो करावा अशी स्पष्ट आज्ञा देऊन ठेविली आहे. ही गोष्ट संस्कृत भाषेचें थोडेंसें ज्ञान असणारासही शास्त्रवचनें पाहिल्यास समजण्यासारखी आहे. पण रूढी ह्या शास्त्रवचनाच्या उलट असल्यामुळें, निषेधार्थक कांहीं वचनें असल्यामुळें, व विधवेनें पुनः लग्न करणें हें अगदीं भ्रष्टतेचें काम अशी समजूत लोकांत दृढ झालेली असल्यामुळें पुनर्विवाहास शास्त्राधार असेल अशी सामान्य लोकांच्या मनांत कल्पनाच भरत नाहीं. हें कांहीं तरी ह्या नवीन लोकांनीं थोतांड काढिलें असावें अशीच साधारण लोकांची समजूत होण्याचा संभव. अशा स्थितींत पुनर्विवाहाच्या शास्त्राधाराची लोकांस माहिती करून देणें हें फार दुर्घट काम होतें. विष्णुशास्त्र्यांनीं प्रथम पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या विधवाविवाह नामक पुस्तकाचें मराठींत संस्कृत वचनांसह भाषांतर केलें. हें एक मोठें साधन झालें. पण हें पुस्तक सर्व लोकांच्या हातीं कसें जाणार? याकरितां शास्त्रीबोवांनीं आपल्या इंदुप्रकाश पत्रांत या विषयाची चर्चा सुरू केली. आमचे जुने लोकही उगीच बसले नाहींत. त्यांणीं शास्त्रीबोवांच्या लेखांवर उलट शंका काढण्यास आरंभ केला व ही उभय पक्षांची झटपट इतक्या कांहीं जोरानें चालली होतीकीं, सन १८६६।६७ सालीं व पुढेंही प्रत्येक इंदुप्रकाशाच्या अंकांत उलट पक्षाचे प्रश्न किंवा त्यांवर विधिपक्षाचीं उत्तरें हीं आल्याशिवाय राहिलीं नाहींत. या वादविवादाकरितां निरनिराळ्या संस्कृत ग्रंथांचें अवलोकनही शास्त्रीबोवांस सतत करावें लागत असे, पण तितकेंही श्रम करून उलट पक्षाच्या प्रश्नास समर्पक उत्तर दिलें गेलें नाहीं असें कधींच झालें नाहीं. विधवेचें गोत्र कोणतें धरावें, तिचें दान कोणीं करावें, अशौचाचा निर्णय कसा, दायभागाचा निर्णय कसा, इत्यादि अनेक तऱ्हेच्या शंका लोक विचारीत व त्यांस साधार उत्तरें तावडतोब दिलींजात असत. शिवाय सभांतून व्याख्यानें व वादविवाद हेही चालू केले होते. मुंबईंत हें काम सतत चाललें होतें, पण बाहेरगांवीं जाऊनही व्याख्यानें देण्यांत येत असत. दुसऱ्या व्यवसायामुळें मुंबई सोडून फारसें बाहेर जातां येत नसे, तरी नाशकास शास्त्रीबोवांचीं कित्येक व्याख्यानें झालीं. व्याख्यानापासून मजल समक्ष वादविवादावर आली. कोणास शास्त्राधाराच्या संबंधानें शंका असेल तर किंवा उलट मत प्रतिपादन करणें असेल तर वादवि-

वादास उभें रहावें अशा जाहिराती मोठमोठ्या शहरीं रस्तोरस्तीं शास्त्री-बोवांनीं आपल्या सहीच्या लाविल्या होत्या. त्यांवरून कऱ्हाड येथील एक गृहस्थ परलोकवासी रा. रा. विठ्ठलपंत अण्णा दप्तरदार ह्मणून होते, त्यांणीं संस्कृत भाषेचा अभ्यास केलेला होता. त्यांणीं ह्या प्रकरणीं आपली वाद॰ करण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यावरून कांहीं दिवसांनीं वाद होण्याचें ठरून विठ्ठलपंत आण्णा सन १८६८ सालीं पुण्यास आले व वाद पुण्यास व्हावा अशी त्यांणीं आपली इच्छा दर्शविली. शास्त्रीबोवांनीं दप्तरदारांचें ह्मणणें कबूल करून तेही आपल्या कित्येक स्नेही मंडळीसह पुण्यास आले. पण शेवटीं समक्ष वादविवाद झाला नाहीं. वादविवादाच्या अटी ठरविण्याबद्दल उभय पक्षांचें बोलणें चालणें चालू असतां, दप्तरदारांनीं एकाएकीं बुधवारांतील पाठा-पुरकराच्या वाड्यांत पुनर्विवाहपक्षाच्या उलट व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. ह्या व्याख्यानांसही शास्त्रीबोवांस येण्याविषयीं सूचना केली नाहीं. उलट पक्षाकडून याप्रमाणें एकतर्फी काम चालू झालेलें पाहून शास्त्रीबोवांनींही आपला पक्ष लोकांस समजावा ह्मणून नारायण पेठेंत परलोकवासी रा. रा. सोन्याबापू मांडे यांच्या घरीं व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. दप्तरदार यांच्या व्याख्यानांचें तात्पर्य लागलींच छापून पत्रकांच्या रूपानें वाटण्यांत येत असे. त्याच पत्रकांतील मुद्यांचें शास्त्री-बोवा आपल्या व्याख्यानांत खंडण करीत असत. या विषयाच्या नवीन-तेमुळें व नाजूकपणामुळें लोकांत त्यावेळीं इतकी चळवळ चालली होती कीं जिकडे तिकडे याच गोष्टी चालत असत. विधिपक्षाच्या मंडळींतही त्यावेळीं या संबंधानें फार हुरूप होता. एका लहानशा प्रसंगावरून ह्या हुरूपाचें मान लक्षांत येण्यासारखें आहे. मांडे यांच्या घरीं शास्त्रीबोवांचें पहिलें व्याख्यान झालें त्याची सर्व व्यवस्था आइत्या वेळेस झालेली असल्यामुळें त्या दिवशीं मंडळी फार जमली नव्हती. पण दुसरे दिवशीं मंडळीची गर्दी इतकी झाली कीं प्रथम दिवाणखान्यांत बैठक घातली होती ती आइत्या वेळेस चौकांत आणावी लागली. चौकांत जागेची नीट व्यवस्था नव्हती. भोंवतालच्या चौसोपींतही अडगळ व केर पडलेला होता. तो काढून तेथें बिछाईत घालण्याचें काम चाकर-माणसें करीत होतीं पण इतका धीर कोणाला होता? शास्त्रीबोवांचे

एक मित्र मुंबईहून त्यांच्या बरोबर गेले होते. हे मुंबईच्या हाय कोर्टांत मोठया हुद्याचे कामगार होते व अद्यापि आहेत, पण त्या ठिकाणीं आपला हुद्दा वगैरे सर्व विसरून जाऊन भरदिशीं केरसुणी घेऊन हे गृहस्थ सोपा झाडूं लागले! घरच्या मालकांस अर्थात् हें खपलें नाहीं. त्यांणीं त्यांच्या हातांतली केरसुणी हिसकून घेऊन चाकराच्या हातीं दिली. थोडयाच वेळांत सर्व व्यवस्था लागून व्याख्यानास सुरवात झाली. असो. रा. रा. बंडुनाना रानडे हे त्या दिवशीं व्याख्यानास आरंभापासून अखेरपर्यंत होते. त्यांणीं शेवटीं शास्त्रीबोवांच्या शोधकपणाची तारीफ केली. कोणता पक्ष सत्य कोणता असत्य हा भाग निराळा, पण शास्त्रीबोवांनीं प्रतिपादिलेल्या गोष्टी आजपर्यंत आपल्या ऐकण्यांत आल्या नव्हत्या व आपल्यास व्याख्यान ऐकून फार संतोष झाला असें त्यांणीं व्याख्यानांतीं बोलून दाखविलेलें आह्मांस चांगलें स्मरतें.

हा वेळपर्यंत शास्त्रीबोवांच्या स्वतःच्या उद्योगासंबंधानें हकीकत सांगितली, पण संघरूपानें जी त्यांणीं व त्यांच्या मित्रांनीं खटपट केली ती सांगावयाची मागेंच राहून गेली आहे. सार्वजनिक कामें करण्याची इंग्रेजी पद्धत आमच्या लोकांत आली आहे तिला अनुसरून ह्या कार्याच्या उद्योगाकरितां **पुनर्विवाहोत्तेजक** (Widow-marriage Association) या नांवाची एक मंडळी मुंबईत सन १८६९ सालीं स्थापन करण्यांत आली. नवीन विद्वानांपैकीं बहुतेक बडी बडी मंडळी या सभेची सभासद होती. श्रीमंत आपासाहेब पटवर्धन जमखिंडीचे संस्थानिक ह्यांणीं ह्या मंडळीचें अध्यक्षस्थान पतकारिलें होतें. परलोकवासी उमदेतुल्मुल्क रघुनाथराव दादासाहेब विंचुरकर हे उपाध्यक्ष होते. स्वतः शास्त्रीबोवांसच मंडळीचे चिटनीस नेमिलें होतें. परलोकवासी रा. रा. बाळ मंगेश वागळे, रा. रा. काशिनाथ त्रिंबक तेलंग. रा. रा. महादेव गोविंद रानडे, जनार्दन सखाराम गाडगीळ, रा. ब. गोपाळराव हरि देशमुख, रा. रा. बाळाजी पांडुरंग, शांताराम नारायण, नारायण महादेव परमानंद, भास्कर हरि भागवत, आबाजी विष्णु काथवटे, वगैरे पुष्कळच मंडळी सभेची सभासद होती. युक्तीच्या दृष्टीनें सर्वांसच पुनर्विवाहाच्या प्रचाराची अवश्यकता दिसत होती, व शास्त्रीबोवांनीं शास्त्राधार दाखविलेलेही मंडळीस सयुक्तिक दिसल्यावरून मंडळीस अधिकच उत्तेजन आलें. उलट पक्षाकडूनही

अशा प्रकारची खटपट चालू झाली. मुंबईसच **हिंदुधर्म व्यवस्थापक मंडळी** ह्मणून एक सभा स्थापन झाली होती. रा. रा. गणेश बापूजी मालवणकर ह्मणून एक गृहस्थ या मंडळींत विशेष खटपटी होते. शिवाय परलोकवासी रा. रा. नीळकंठराव जोशी कस्टमकडील दफ्तरदार हे ह्या पक्षाकडे होते. जुनी शास्त्री मंडळीही या सभेंत होती. ह्या उलट पक्षाच्या मंडळीच्या सभा ठाकुरद्वारांत भरत असत. पुनर्विवाह शास्त्रविरुद्ध आहे असें ही मंडळी व्याख्यानद्वारा व वर्तमानपत्रद्वारा प्रतिपादन करीत असे. या विषयाबद्दल विरुद्ध पक्षाचा एवढा द्वेष असे कीं, विष्णुशास्त्री व त्यांच्या पक्षाची मंडळी यांचा ते पाहिजे तसा उपहास करीत व निंदायुक्त शब्दांचा यथेच्छ प्रयोग करीत असत. वादविवादाचा जो सरळ मार्ग कीं विरुद्ध वचनें असतील तीं दाखवून, आपल्या दृष्टीनें पुनर्विवाहाचा प्रचार पडल्यापासून काय हानि होईल ती दाखवावी, तेवढेंच करून रहात नसे. असो. असा उभय पक्षाचा वादविवाद सुमारें तीन वर्षं चालू होता. पुढें पुनर्विवाह पक्षाच्या मंडळीनें असा विचार केला कीं शास्त्रार्थाच्या वादविवादांत अधिक काळ घालविण्याचें कारण नाहीं. पुनर्विवाहाचा प्रचारच पाडण्यास आरंभ करावा.

एथें "आरंभ" ह्मटलें पण पुनर्विवाहास आरंभ या पूर्वींच होऊन चुकला होता. तीन पुनर्विवाह होऊन गेले होते. अहंमदाबाद म्युनिसिपालिटीमध्यें रा. रा. रघुनाथ जनार्दन ह्मणून एक गौड ब्राह्मण होते त्यांणीं आपल्या ज्ञातींतील एका **चिमणाबाई** नांवाच्या गतभर्तृकेशीं सन १८९३ किंवा ९४ सालीं पुणें मुक्कामीं विवाह केला होता. पण ह्या गृहस्थांचें पहिलें कुटुंब असतां हे दुसरें करीत होते यामुळें त्यांचा हा विवाह पुष्कळ सुधारक मंडळीस मान्य नव्हता. कांहीं थोड्या मंडळीच्या साहाय्यानें रघुनाथजीनीं हा विवाह करून घेतला. दुसरा विवाह गुजराथी ज्ञातींत **दिवाळीबाई** नांवाच्या बाईचा सन १८६१ सालीं झाला होता. तिसरा विवाह पुण्यांतील प्रसिद्ध वकील परलोकवासी रा. रा. **नारायण जगन्नाथ** ऊर्फ **नाना भिडे** यांणीं आपल्या मृत पत्नीच्या गतभर्तृका बहिणीशीं सन १८६६ सालीं केला होता. हा विवाह पुण्यास होणार अशी प्रथम वदंता उठली होती पण शेवटीं तो मुंबई नजीक वांद्रें एथें झाला. हे तीन विवाह झाले होते तरी ते विशेष प्रसिद्धपणें

झाले नव्हते. कांहीं थोड्या मित्रमंडळीच्या साहाय्यानें ते झाले होते. ह्मणून पुनर्विवाहोत्तेजक मंडळीनें अगदीं प्रसिद्धपणें विवाह करण्याचें योजिलें.

विवाहास वधुवरांची मुख्य तयारी पाहिजे. ही अडचण अशा वेळीं सामान्य नव्हती. लोकांत ह्या गोष्टीची विशेष चर्चा होऊन अनुकूल पक्षास जसा आवेश आला होता तसा विरुद्ध पक्षासही नाना प्रकारचे अडथळे आणण्यास व नाना तऱ्हेनें त्रास देण्यास आवेश आला होता. पण ह्या अडचणीपैकीं अर्धी अडचण दूर होण्याची त्या वेळीं सुदैवानें सहजीं तयारी झालेली होती. वेणूबाई नांवाच्या एका तरुण गतभर्तृकेचे आई बाप निवर्तलेले असून तिचे दोघे बंधु (रा.रा. वामनराव व नारायणराव पराजपे) होते ते फार दिवसांपासून पुनर्विवाहपक्षाचे असून त्यांच्या मनांत आपल्या वहिणीस वैधव्याच्या दुःखांतून मुक्त करावें असें होतें. वहिणीचा भावांवर पूर्ण विश्वास होता यामुळें ते करतील तें आपल्या कल्याणाचेंच करतील असें समजून तिणेंही लोक रूढीविरुद्ध गोष्ट करण्यास आपली मान्यता दिली होती. या कामीं या वधूच्या धारिष्टवान् बंधूंस त्यांच्या कांहीं मित्र मंडळीचीही अनुकूलता होती, व ते योग्य वराच्या शोधांत होते. इतक्यांत ही पुनर्विवाहोत्तेजक मंडळी स्थापन झाली होती व तिचा प्रसिद्धपणें विवाह घडवून आणण्याचा विचार झाला तेव्हां वरील वधूच्या बंधूंनीं या मंडळीच्या मार्फतच आपल्या बहिणीचा विवाह करण्याचें योजिलें. वराची अजून तयारी नव्हती, याकरितां इंदुप्रकाश पत्रांत पुनर्वि० मंडळीनें जाहिरात देऊन कोणी गृहस्थ विधवेशीं विवाह करण्यास तयार असल्यास त्याणें मंडळीस आपली हकीकत कळवावी ह्मणून सुचविलें. वधु सिद्ध होती यामुळें मंडळीची अर्धी अडचण दूर झाली होती, तरी अर्धी राहिलेलीही कांहीं सामान्य नव्हती. विरुद्ध पक्ष इतका प्रबळ असतां अशा वेळीं लोकरूढीविरुद्ध प्रसिद्धपणें विधवेशीं विवाह करण्यास पुढें येण्यास विशेष धारिष्ठवान् पुरुषाची गरज होती. मोठ मोठे नांवाचे हुद्दे बाळगणारे सरदार सैन्यांत पुष्कळ असतात, पण खऱ्या शूराची परीक्षा युद्धाच्या वेळींच होते. अशा वेळीं सर्व नांवाच्या हुद्देवाल्या सरदारांस मागें टाकून एखादा १० रुपये पगाराचा शिपाईच शौर्याचें कामांत प्रमुखत्व पावतो. ह्या पुनर्विवाहाच्या आरंभाच्या कामींही असाच अनुभव आला.

व हुतेक सुशिक्षित लोक पुनर्विवाहपक्षाकडचे होते. यांत अविवाहित किंवा विधुर असे कित्येक असतील. पण वरील जाहिरातीस अनुकूल जबाब देण्यास त्या विशेष सुशिक्षित ह्मणविणाऱ्या मंडळींत कोणी निघाला नाहीं. ज्या प्रकारचें धारिष्ट अशा प्रसंगीं पाहिजे होतें अशा धारिष्टाचा पुरुष ज्यांचीं नांवें प्रसंगाशिवाय अप्रसिद्ध असावयाचीं अशा सामान्य मंडळींतच आढळून आला. खानदेश जिल्ह्यांत सावदें ह्या गांवीं रा. रा. पांडुरंग विनायक करमरकर नावाचे एक हिंमतवान् गृहस्थ मराठी स्कूल मास्तर होते. त्यांच्या दृष्टीस वरील जाहिरात पडल्याबरोबर त्यांणीं या कामीं पुढें पाऊल टाकण्याचें पतकरून त्याप्रमाणें आपला विचार मंडळीस कळविला. मंडळीनें त्या गृहस्थांची चौकशी करून ते योग्य आहेत असें दिसून आल्यावर त्यांशीं विवाह करण्याचें ठरविलें. व त्या प्रमाणे ते रजा घेऊन मुंबईस निघून आले. विवाहसमारंभ विशेष प्रसिद्धपणें करण्याचा मंडळीचा विचार होता यामुळें त्याकरितां तयारीहि तशीच केली होती. विवाहाचा दिवस ठरवून पुनर्विवाहपक्षाच्या सर्व हितचिंतक मंडळीस सात प्रमुख गृहस्थांच्या सह्यांनिशीं निमंत्रणपत्रिका पाठविण्यांत आल्या व वर्तमानपत्रद्वाराही सर्व हितचिंतक लोकांस बोलावणें करण्यांत आलें होते. हेच सात गृहस्थ पुढें लोकांच्या विशेष दृष्टीपुढें आले ह्मणून त्यांचीं नांवें एथें देतों.

१ वे. शा. रा. रा. विष्णु परशुराम शास्त्री पंडित.
२ रा. ब. गोपाळराव हरि देशमुख
३ रा. ब. महादेव गोविंद रानडे
४ रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे.
५ रा. ब. विष्णु परशुराम रानडे.
६ रा. सा. श्रीकृष्ण शास्त्री तळेकर.
७ रा. रा. जनार्दन सखाराम गाडगीळ.

विवाहाकरितां स्थळ परलोकवासी रा. ब. मोरोबा कान्होबा यांचा गोवाळी तळ्यावरील बंगला हें ठरविलें होतें. हे गृहस्थ ह्या कार्याची फारच कळकळ वाळगणारे होते. यांणीं पुढें स्वतः विधवेशीं विवाह करून आपल्या पाठाणे प्रभु ज्ञातीस उदाहरण घालून दिलें आहे. पण अद्यापि त्या ज्ञातींत ह्या उदाहरणाचें अनुकरण करणारा योग्य पुरुष

निघाला नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. रा. ब. मोरोबा कान्होबा यांणीं स्वतःच्या खर्चानें आपला बंगला उत्तम प्रकारें शृंगारून विवाहास सिद्ध केला होता.

विवाहाची जेव्हां सर्व तयारी झाली, तेव्हां विरुद्ध पक्षास आपली सर्व खटपट वाया जाते व विधवाविवाहास प्रसिद्धपणें सुरुवात होते असें दिसून अर्थात् फार वाईट वाटलें. हरतऱ्हा करून निदान हा विवाह ह्या दिवशीं होऊं देऊं नये ह्मणजे कदाचित् वधुवरांपैकीं कोणी तरी पुढें नाकबूल झाल्यास विवाह मुळींच बंद राहील अशी दुर्वासना धरून त्यांणीं आपल्याकडून बरी वाईट पुष्कळ खटपट केली. विष्णुशास्त्री पंडित यांस निनांवी पत्रें पाठवून व एका गृहस्थानें तर प्रसिद्धपणें इंदुप्रकाश छापखान्याच्या इमारतीस आग लावण्याची धमकी घालून पाहिली. मारामारी करून वरास विवाहापूर्वीं कांहीं तरी दुखापत करून लग्नास विघ्न आणण्याचाही घाट घातला. पण यांस शास्त्रीबोवांनीं मुळींच जुमानलें नाहीं. धमकी घालणारांचे माजिस्ट्रेटापुढें मुचलके मात्र घेऊन ठेविले व मारामारी होऊं नये असाही बंदोबस्त ठेविला.* शेवटीं उलट पक्षानें अशी शक्कल काढिली कीं, पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीं उभय पक्षांचा प्रसिद्धपणें वादविवाद व्हावा व मग पुनर्विवाह सशास्त्र ठरल्यास मंडळीनें हा विवाह करावा. तोंपर्यंत विवाह तहकूब ठेवावा. अशा अर्थाचें हिंदुधर्मव्यवस्थापक मंडळीकडून पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस ठरलेल्या विवाहाच्या आधीं एक कीं दोन दिवस पत्र आलें. इतक्या दिवस वाद करण्यास विधिपक्षाची मंडळी सिद्ध असतां उलट पक्ष वादास आला नाहीं व आतां कोणीकडून तरी हा विवाह होऊं देऊं नये असा त्यांचा उघड हेतु पाहून मंडळीनीं आपला विचार कायम ठेविला. विवाहाच्या वेळीं

---

* हा मारामारीचा घाट मुंबईंतील टोळीवाल्या बदमाश लोकांच्या मदतीनें कांहीं लोक करणार होते. ही बातमी समजतांच पुनर्विवाहपक्षासही एका तालमीचे वस्ताद व सुधारणेच्या कामीं लक्ष पुरविणारे असे एक बोवा मिळाले व त्यांणीं विरुद्ध पक्षांतील दंगेखोरांच्या पुढाऱ्यांस "मारामारी वगैरे कराल तर माझ्याशीं गांठ आहे. वरास दुखापत करण्याच्या ऐवजीं आपल्यास करून घ्याल" अशी उलट तंबी दिल्याबरोबर ह्या दुर्विचाराचें नांवच कोणीं काढलें नाहीं.

उलट पक्षाकडून दंगा न होऊं देण्याविषयीं बंदोबस्त राखिला. ह्या कामीं सरकारी अधिकाऱ्यांकडून सर्व प्रकारें साहाय्य मिळालें व अखेरीस नेमल्या दिवशीं ह्मणजे मिती जेष्ठ शुद्ध ६ शके १७९१ ता. १९ माहे जून सन १८६९ रोजीं गोरज मुहुर्तावर पहिला पुनर्विवाह प्रसिद्धपणें झाला. समारंभास हायकोर्टाचे जज्ज, ब्यारिस्टर वगैरे मोठमोठे युरोपिअन लोक व शहरांतील दक्षणी, गुजराथी, भाटे वगैरे ज्ञातींतील प्रसिद्ध प्रसिद्ध लोक पुष्कळ आले होते. विवाहाविधि विष्णुशास्त्री पंडित यांणीं दुसऱ्या कांहीं भिक्षुक मंडळीच्या साहाय्यानें हिंदुविवाहपद्धती प्रमाणें चालविला. विवाहाच्या वेळीं चांदला करण्याची जी विशेषेंकरून गुजराथी लोकांत पद्धति आहे व जी मुंबईंत इतर लोकांनींही घेतली आहे, त्या पद्धती प्रमाणें पुष्कळ लोकांनीं चांदला केला त्याची रक्कम सुमारें ३००० रुपये झाली. ती वधूच्या नांवें मंडळीनें ब्यांकेंत ठेविली. समारंभ फारच प्रेक्षणीय झाला. त्याचें वर्णन इंदुप्रकाश पत्रांत फार सुरेख रीतीनें आलें होतें. त्याचा उतारा त्या वेळीं चालू असलेल्या "शालापत्रक" नामक मासिक पुस्तकांत त्याच्या विद्वान कर्त्यांनीं उत्तम वाचनीय लेख ह्मणून घेतला होता. विवाहसंबंधानें जेवणावळ झाली तीसही मुंबईंतील व बाहेर गांवची पुष्कळ मंडळी होती.

अशा रीतीनें हा पहिला विवाह निर्विघ्नपणें तडीस गेल्यावर आणखी विवाह घडवून आणणें एवढेंच काम मंडळीचें राहिलें होतें. पण ही दिशा बदलून मध्यंतरीं मंडळीस दुसऱ्याच कामास लागावें लागलें. विवाह झाल्याबरोबर उलट पक्ष चवताळला व बहिष्काररूपी महा अस्त्राचा प्रयोग त्याणें सुरू केला. जितके लोक विवाहसमारंभास गेले होते त्यासर्वांस बहिष्कार घालावा तर शेकडों लोक त्यांत येऊन त्याचा जोर मुळींच नाहींसा होणार. जितकी मंडळी भोजनास गेली होती त्यांस बहिष्कार घालावा तरी असाच प्रकार होणार. तरी पहिल्यानें भोजनास गेलेल्या सर्व मंडळीस बहिष्कार घालण्याचाच उलट पक्षांतील कांहीं मंडळीचा विचार होता. पण आलीकडे नुकतेच जे परलोकवासी झाले व ज्यांस हिंदुसमाजाचे प्रमुख असें कित्येक लोक समजत असत, त्या गृहस्थांनीं* असा सल्ला दिल्याचें ऐकण्यांत आहे कीं, इत-

*हे गृहस्थ जरी प्रसिद्धपणें उलट पक्षाकडे होते, तरी यांचें स्वतःचें मत

च्या लोकांस बहिष्कार घालणें ही मोठी चूक होईल. याणें बहिष्कृत लोकांचा चांगला छळ होणार नाहीं, याकरितां त्यांतील प्रमुख मंडळीसच तुह्मीं पकडा. ही मसलत विरुद्ध पक्षास मान्य होऊन ज्या सात गृहस्थांच्या सह्यांचें निमंत्रण पत्रक निघालें होतें, त्यांस व विवाहांतील वधुवर व वधूचे दोघे बंधु मिळून ११ जणांस मात्र बहिष्कृत करण्यांत आलें होतें. या संबंधानें ठाकुरद्वारीं जी सभा भरली होती तींत काय ठराव झाला याविषयीं मागून तकार उत्पन्न झाली. कारण सभेचें काम व्यवस्थितपणें न चालतां सर्व गोंधळ झाला होता. तरी सभेनें ११ जणांस बहिष्कृत केलें आहे अशीं गांवोगांवीं विरुद्ध पक्षाकडच्या लोकांनीं पत्रें पाठविलीं. हीं बहुधा रा. रा. गणेश बापूजी मालवणकर यांच्या व आणखी एक दोन शास्त्रांच्या सह्यांचीं असावीं. त्यांबरोबर दुसऱ्या चार गृहस्थांच्या सह्यांचीं अशीं पत्रें निघालीं कीं ठाकुरद्वाराच्या सभेंत असा कांहीं सर्वानुमतें ठराव झाला नाहीं. याकरितां तो कोणी मानूं नये. या चार गृहस्थांचीं नांवें रा. रा. भास्कर शास्त्री तालनकर, सखाराम शास्त्री काळे, महादेव चिमणाजी आपटे व अण्णा मोरेश्वर कुंटे. यावरून विरुद्धपक्षानें या चार जणांसही बहिष्कृत केलें. ठाकुरद्वारच्या सभेंत अनुकूल पक्षाकडचीही कांहीं मंडळी गेली होती, तिणें एक कसलीशी याद विरुद्ध पक्षाचे मंडळीपैकीं एकाच्या हातांतून पहावयास घेतली. त्या यादीबद्दल उभय पक्षांत कांहीं बोलाचाली झाली, तेवढें निमित्त धरून अनकूल पक्षाच्या कांहीं मंडळीवर मारामारीचीच फिर्याद करून त्यांस त्रास देण्याची एक संधि विरुद्ध पक्षानें साधली! रा. ब. विष्णु परशुराम रानडे, रा. रा. बाळ मंगेश वागळे, नारायण माहादेव परमानंद, वगैरे मंडळीवर फिर्याद होती. रा. वागळे हे ब्यारिस्टर असल्यामुळें म्याजिस्ट्रेटांनीं त्यांजवर समान दिलें नाहीं. बाकीच्या

---

पुनर्विवाहास अनुकूल होते. मात्र ज्या मंडळीनें हें काम हातीं घेतलें होतें त्यांवर त्यांचा विश्वास नव्हता म्हणून ते कांहीं दिवस विरुद्ध पक्षास न मिळतां अलग राहिले होते. ह्या वरील पहिल्या विवाहांतील विवाहापूर्वी वधूची कांहीं तरी चांगली व्यवस्था व्हावी म्हणून ह्या गृहस्थांनीं आपल्या एका मित्राच्या मार्फत वधुपक्षाकडील मंडळीस कित्येक सूचना पाठविल्या असें आम्हांस या पक्षाकडच्या एका वृद्ध व विश्वसनीय गृहस्थांकडून कळलें आहे.

मंडळीवर खटला चालून पुरावा नाहीं ह्मणून म्याजिस्ट्रेटानें खटला सोडिला.

नंतर पुनर्विवाहाच्या पक्षांतील मंडळीवर घातलेला बहिष्कार बरोबर नाहीं; पुनर्विवाह अशास्त्र असें विरुद्ध पक्षानें वाद करून ठरविलें नाहीं, तेव्हां वाद होऊन निकाल होईपर्यंत बहिष्कार घातलेला कोणी मानूं नये असें ह्मणणारी कित्येक मंडळी पुढें आली. ही मंडळी आपलें ह्मणणें वर्त्तमानपत्रद्वारा सह्यांनिशीं कळवूं लागली. ह्या सह्यांची संख्या १,७२ पर्यंत गेली होती. ह्यांत बहुतेक पुण्यांतील नवीन सुशिक्षित मंडळी होती. ही संख्या जेव्हां वाढत चालली तेव्हां विरुद्ध पक्षास वादविवाद करण्याची अवश्यकता दिसूं लागली. मग त्यांनीं करवीर व संकेश्वर मठाचे शंकराचार्य यांस ह्या प्रकरणाचा निकाल लावण्याविषयीं विनंति केली. स्वामींनीं स्वतः पुण्यास येण्याचें ठरवून त्याप्रमाणें शके १७९१ च्या माघ किंवा फाल्गुनमासीं ह्मणजे सन १८७० च्या मार्च महिन्यांत श्रीची स्वारी पुण्यास आली. विधिपक्षास वाद करण्यास येण्याबद्दल सूचना झाली व ती त्यांणें मान्य केली. वादाकरितां ठिकठिकाणचे शास्त्री श्रीच्या निमंत्रणावरून आले होते. वादाच्या अटी काय असाव्या हा प्रथम प्रश्न निघाला. वादांत कोणी जिंकलें व कोण हरला हें ठरावयाचें कसें? शंकराचार्य पुनर्विवाहाच्या विरुद्ध असल्यामुळें त्यांच्याकडून न्यायानें वादाचा निकाल होईल कीं नाहीं या गोष्टीची विधिपक्षाचे मंडळीस सहजींच मोठी शंका होती. उभय पक्षांचा वाद व्हावा व त्यांचीं प्रश्नोत्तरें छापून प्रसिद्ध करावीं आणि त्यांवरून लोकांनीं आपआपल्या विचारानें खरें खोटें ठरवावें असा विधिपक्षाचा एक विचार होता, पण तो शंकराचार्यांस मान्य न होऊन वादविवादाअंतीं आह्मीं जी आज्ञा करूं ती मान्य करावी असें त्यांचें ह्मणणें पडलें. शेवटीं हें ह्मणणें विधिपक्षानें कबूल केलें. ही गोष्ट ह्या मंडळीनें केली ती विचारानें केली किंवा हींत चूक झाली हें ठरविणें वादग्रस्त आहे. वडपडीत आपल्या उलट पक्षाकडे निकाल करण्याचा अधिकार द्यावयाचा ही मोठी चुकीची गोष्ट दिसते. पण वादविवादच करणें तर शेवटीं कोणाचें तरी निकालाचें मत घेतलेंच पाहिजे व तें शंकराचार्यांशिवाय दुसरें कोणाचें घेतां येणार? तेव्हां वरील अट नाकबूल करण्यास नागाच नव्हती. तरी शंकराचार्य व वादी प्रतिवादी यांच्या दरम्यान पंच व

सर पंच नेमण्याचें ठरलें होतें. प्रत्येक पक्षाचे पांच पांच पंच होते, व एक सर पंच होता. १० पंचांपैकीं बहुमत जिकडे होईल त्याणें जिंकलें असें समजावयाचें. समसमान मतें पडल्यास सर पंचाचें मत घ्यावयाचें व तें जिकडे पडेल त्या पक्षानें जिंकलें असें मानावयाचें. विधिपक्षाच्या तर्फे जे कोणी मत देतील त्यांस मागून कोणताही त्रास पोंचूं नये असें अभयवचन शंकराचार्यांकडून घेऊन ठेविलें होतें. "श्री उदासीन राहील व ज्याचें खरें येईल त्याचा इकडून अपलाप होणार नाहीं" असें स्वामींनीं विधिपक्षाच्या विनंती वरून लेखी कळविलें होतें. वाद पुण्यांत शनवार पेठेंत दिक्षितांचें वाड्यांत झाला. विधीपक्षांकडून वे. शा. विष्णुशास्त्री पंडित हे बोलणारे होते व निषेधपक्षाकडून वे. शा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर हे बोलणारे होते. उभय पक्षांकडील पंच व सरपंच खालीं दिल्याप्रमाणें होते.

| विधिपक्ष. | निषेधपक्ष. |
|---|---|
| १ वे. शा. कृष्णशास्त्री चिपळोणकर. | १ वे. शा. भिकूशास्त्री गोडबोले. |
| २ ,, रावजीशास्त्री आगाशे. | २ ,, दिनकरशास्त्री खांबेटे. |
| ३ ,, रघुनाथशास्त्री शेंडे. | ३ ,, आप्पाशास्त्री खाडिलकर. |
| ४ ,, केशवशास्त्री गाडगीळ. | ४ ,, भिकाचार्य ऐनापुरे. |
| ५ ,, व्यंकटशास्त्री माटे. | ५ ,, गणेशशास्त्री कोल्हटकर. |

**सरपंच**—वे. शा. गोपाळाचार्य कऱ्हाडकर.

विधीपक्षाच्या तर्फे वादाचीं टिपणें रा. ब. महादेव गोविंद रानडे हे ठेवीत होते व निषेधपक्षाच्या तर्फे रा. रा. विठ्ठलपंत अण्णा दप्तरदार हे ठेवीत होते. उभय पक्षांचीं प्रश्नोत्तरें लेखी होऊन त्यांवर उभय पक्षांच्या बोलणारांच्या सह्या होत असत. फाल्गुन वद्य ११ शके १७९१ ह्मणजे ता. २८ मार्च १८७० रोजीं वादास आरंभ होऊन तो ९ दिवस चालला होता. विधिपक्षाच्या मनांत आणखी पुष्कळ प्रमाणें द्यावयाचीं होतीं, पण झाला इतका वाद पुरे असें शंकराचार्यांनीं ठरवून उभय पक्षांच्या पंचांनीं आपआपले अभिप्राय द्यावे अशी आज्ञा केली. विधिपक्षानें ह्या गोष्टीस फारशी हरकत घेतली नाहीं. पंचांनीं आपले अभिप्राय लवकरच दिले. त्यांत निषेध पक्षाच्या पांचहीं पंचांनीं आपले अभिप्राय त्याच पक्षास अनुकूल असे

दिले. विधिपक्षाच्या चार पंचांनीं त्या पक्षास अनुकूल असे अभिप्राय दिले पण एका पंचानें उलट पक्षाकडे अभिप्राय दिला. ही गोष्ट पुढें फारच अनिष्ट अशा गोष्टींस कारण झाली. ह्मणजे या अभिप्रायामुळें फौजदारी खटले उपस्थित होऊन निषेध पक्षाकडच्या रा. गणेशबापूजी माळवणकर या गृहस्थास एका खटल्यांत शंभर रुपये दंड व एका खटल्यांत ३ महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली. या खटल्याचा पुनर्विवाहाच्या प्रचारार्थ उद्योगांशीं काय संबंध आहे हें एकदम समजण्यासारखें नाहीं पण या खटल्यापासूनच पुनर्विवाहाच्या वादाच्या निकालाचें खरें स्वरूप बाहेर आलें ह्मणून व वादांतील एका पंचाच्या अभिप्रायापासून फौजदारी खटले कसे उपस्थित झाले अशीही सहज शंका उत्पन्न होणारी आहे ती दूर व्हावी अशा दुहेरी उद्देशानें या खटल्याची हकीकत थोडक्यांत पुढें देतों.

ज्या विधिपक्षाच्या पंचानें उलट पक्षाकडे अभिप्राय दिला त्यांचें नांव व्यंकट शास्त्री माटे. हे गृहस्थ फार वृद्ध होते व स्वभावाचे सरळ पण भिडस्त असे होते. यांणींच विष्णुशास्त्री पंडित यांस पुनर्विवाहास अनुकूळ असा एक शास्त्राधार आपण होऊन दाखविला होता. तो आधार विष्णु शास्त्र्यांनीं वादांत दिला होता. व्यंकटशास्त्र्यांचा अभिप्राय जर सरळ रीतीनें उलट पक्षाकडचा झाला असता तर या त्यांणींच दाखविलेल्या आधाराचें त्यांणीं खंडन करावयास पाहिजे होतें. पण त्यांणीं आपल्या अभिप्रायांत त्या आधाराचा मुळीं उल्लेखच केलेला नव्हता. तेव्हां या गोष्टीचा खुलासा करून घ्यावा अशी विष्णु शास्त्र्यांस सहजीच इच्छा झाली. त्यांणीं सिद्धेश्वर शास्त्री नांवाच्या एका मित्रास व्यंकटशास्त्र्यांस भेटून त्याविषयीं निरोप पाठविला. त्या प्रमाणें ते दुसरे दिवशीं सकाळीं विष्णु शास्त्र्यांच्या बिऱ्हाडीं भेटावयास आले. त्या वेळीं तेथें परलोकवासी रा. ब. विष्णु परशुराम रानडे, रा रा. केशव पांडुरंग गोडबोले नारायण बापूजी गोरे, व वरील सिद्धेश्वर शास्त्री इतकी मंडळी होती. विष्णुशास्त्र्यांनीं वादावरील अभिप्रायाबद्दल आपली शंका व्यंकटशास्त्र्यांस विचारल्यावरून त्यांणीं सांगितलें कीं माझा अभिप्राय अद्यापि मूळच्या प्रमाणेंच विधिपक्षास अनकूल असा आहे. पण काय करावें! कित्येक शास्त्री मंडळीचा व शेवटीं खुद्द शंकराचार्यांचा आग्रह मी उलट मत देण्याबि-

षर्यी पडला. "धर्मराज देखील खोटें बोलले मग अशा वेळीं तु-ह्मांस बोलण्यास काय हरकत आहे" असें ह्मणून मजपासून स्वामी-च्या पायाची शपथ वाहून घेतली. या मुळें मला असा अभिप्राय द्या-वा लागला. हें भाषण ऐकून तेथें असलेल्या मंडळीस सहजींच आश्च-र्य वाटलें व निषेधपक्षानें कोणत्या निंद्य प्रकारानें पुनर्विवाह अशास्त्र ठरविण्याचा उद्योग चालविला आहे हें पाहून त्यांपैकीं नारायण बा-पूजी गोरे यांणीं वरील घडलेली हकीगत पुण्याच्या ज्ञानप्रकाश पत्राच्या ता. १४ एप्रिल सन १८७० च्या अंकांत आपल्या सहीनें प्रसिद्ध केली. ही गोष्ट विरुद्ध पक्षास फारच मारक होती तेव्हां त्यांणीं ती खोटी आहे असें ठरविण्याचा यत्न केला. बिचाऱ्या व्यंकटशास्त्र्याची इकडे आड व इकडे विहीर अशी स्थिति झाली होती. त्यांचा स्वभाव पक्का दृढ निश्चयी नव्हता. गोरे यांणीं वरील हकीकत प्रसिद्ध केल्या-बरोबर विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं व्यंकटशास्त्र्यांस स्वामीकडे बोलावून नेलें व आपण विष्णुशास्त्री यांजकडे मुळींच गेलों नाहीं व त्यांस गोरे यांणीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें हकीकत मुळींच सांगितली नाहीं, अशा मतलबाच्या एका कागदावर त्यांची सही घेतली. व्यंकटशास्त्र्यांस ही स्वामीची व मंडळीची भीड उरकली नाहीं व हीच गोष्ट पुढें फार विकोपास गेली. एप्रिल १८७० च्या १५ तारखेस व्यंकटशास्त्र्यांच्या सहीचा हा लेख घेऊन १६ तारखेस तो विरुद्धपक्षानें जाहिरनामा ह्म-णून प्रसिद्ध केला व त्यांत ज्ञानप्रकाश पत्रावरही खोटेपणाचा आरोप केला होता. आपण करूं ती पूर्वदिशा असें विरुद्धपक्षास वाटत होतें. त्यांणीं लेखांत व भाषणांत ताळ ह्मणून ठेवला नव्हता. १७ एप्रिल रोजीं शंकराचार्यांनीं पुनर्विवाहाच्या वादाचा निकाल सांगण्याकरितां मोठी सभा भरविली. निकाल कळविण्याचें काम गणेश बापूजी मालवण-कर हे मोठे वक्ते ह्मणून त्यांजकडे सोंपविलें होतें. मालवणकर हे खरोखरच फार बोलके होते पण त्यांणीं बोलण्यांत विचार ह्म-णून कांहीं ठेविला नाहीं. स्वामींनीं फक्त पंचांचे अभिप्राय कळ-विण्यास सांगितलें होतें, पण ह्यांणीं व्यंकटशास्त्र्याच्या सहीचें पत्र व त्या संबंधानें प्रसिद्ध केलेला जाहिरनामा प्रथम वाचून दाखविला व नारायण बापूजी गोरे यांची व ज्ञानप्रकाश

आणि इंदुप्रकाश यांची यथेच्छ निंदा केली. गोरे यांणीं प्रसिद्ध केलेली हकीकत खोटी आहे व या करितां त्यांस "गोरे" ह्मणण्यापेक्षां "काळे" ह्मणावें हें बरें असे शब्द योजिले. गोरे यांस आपली खोटी निंदा केलेली अर्थात् सहन न होऊन त्यांणीं आपली बेअब्रू केल्याबद्दल रेलवे माजिस्ट्रेट डाक्टर फ्रेजर यांजकडे फिर्याद केली. गोरे यांणीं प्रसिद्ध केलेली हकीकत खरी होती याजबद्दल, विष्णु शास्त्री पंडित, विष्णु परशुराम रानडे, केशवराव गोडबोले वगैरे जी मंडळी व्यंकटशास्त्रयाच्या भेटीच्या वेळीं हजर होती त्यांच्या साक्षी झाल्या. सभेंत वरील शब्द योजिल्याबद्दल दुसऱ्या कित्येक साक्षी झाल्या. विरुद्ध पक्षानें व्यंकटशास्त्री भेटीच्या वेळीं दुसऱ्या ठिकाणीं होते (alibi) असा पुरावा आणला, पण तो उलट तपासणींत मुळींच टिकला नाहीं. तो पुरावा खोटा आहे असें म्याजिस्ट्रेटास दिसलें, पण व्यंकटशास्त्री फार ह्मातारा व भोळा मनुष्य तो इतर मंडळीच्या आग्रहानें फसला ह्मणून म्याजिस्ट्रेटानें त्यास सोडून दिलें व मालवणकरावर बेअब्रू केल्याचा आरोप सिद्ध होऊन ता. ९ मे १८७० रोजीं ३२ दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा झाली. डा. फ्रेजर यांणीं या खटल्याव-र आपला जो अभिप्राय लिहिला होता तो वाचण्यासारखा होता ह्म-णून ता. १६ मे १८७०च्या इंदुप्रकाशांत तो निराळाच पुरवणीच्या रूपानें छापिला होता. या निकालावर डि. जज्जाकडे अपील झालें त्यांत आरोप शाबीत ठरला पण कैदेची शिक्षा बदलून १०० रुपये दंडाची शिक्षा झाली व ती हाय कोर्टांतही कायम ठरली. वरील खटल्यांत विरुद्ध पक्षाकडून ज्या लोकांनीं खोट्या साक्षी दिल्या होत्या त्यांवर खटले चालले त्यांत मालवणकरांची साक्ष होती. तींत त्यांणीं धडधडीत एक गोष्ट खोटी सांगितली. तिजवरून म्याजिस्ट्रेटानें त्यांजवर खोट्या साक्षीचा खटला करून सेशन कमिट के-ला. सेशन जज्जानें या खटल्यांत मालवणकरांस ३ महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा दिली. ज्ञानप्रकाश व इंदुप्रकाश यांणींही मालवणकरावर बेअब्रूच्या फिर्यादी केल्या होत्या. त्यांत ज्ञानप्रकाशाची मालवणकरांनीं माफी मागितली व इंदुप्रकाशाच्या मालकांनीं वरील खोट्या साक्षीच्या खटल्याचा निकाल होऊन आरोपीस शिक्षा झाल्यावर आपली फिर्याद काढून घेत-

ली. ह्या दुसऱ्या खटल्यांत व्यंकटशास्त्री माटे यांची साक्ष झाली तींत त्यांणीं विष्णु शास्त्री यांस पुनर्विवाहास अनुकूल शास्त्राधार दिल्याची गोष्ट कबूल केली व तो आधार आपल्यास अद्यापि मान्य आहे, त्याच्या उलट आधार अद्यापि मिळाला नाहीं असें कबूल केलें. ही जबानी पुनर्विवाहाच्या वादाचें साद्यंत पुस्तक इंदुप्रकाशाच्या मालकांनीं छापिलें आहे त्यास जोडलेली आहे.

ह्या सर्व हकीकतीवरून वादांत पुनर्विवाह अशास्त्र कोणत्या उपायांनीं ठरविला गेला हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. ह्या वादांतील विरुद्ध पक्षाच्या पंचांपैकीं दिनकर शास्त्री खांवेटे यांणीं वाद चालू असतां भर सभेंत असें बोलून दाखविलें होतें कीं आह्मांस सत्यासत्य पाहण्याची कांहीं जरूरी नाहीं. आह्मांस कोणीकडून तरी विधिपक्षाचा पाडाव करावयाचा. या भाषणावरून हे शास्त्रीबोवा न्याय निवडण्यास कितपत योग्य आहेत इकडे स्वामींनीं लक्ष्य द्यावें अशी विष्णुशास्त्री यांणी विनंति केली होती पण स्वामींनीं त्यांस पंचांत तसेंच राहूं दिलें. या पंचाचें मत जमेस धरण्यासारखें नाहीं व व्यंकट शास्त्रयांचें मत वास्तविक पणें विधिपक्षाकडचेंच आहे तेव्हां विधिपक्षाकडेच बहुमत आहे. ह्मणून पुनर्विवाह वादांत सशास्त्रच ठरला, असा पुनर्विवाहोत्तेजक मंडळीनें ठराव केला आहे तो सरळ न्यायाचा आहे असें स्पष्ट दिसतें. उभय पक्षाकडचे पुरावे वाचून पाहिल्यास निदान एवढी गोष्ट तरी प्रत्येकास कबूल करावी लागेल, कीं विधवांनीं पुनःलग्न करावें अशाबद्दल पूर्वकाळीं कित्येक शास्त्रकारांनीं आपलें मत दिलेलें होतें. असो.

हें वादविवादाचें प्रकरण अशा उभयपक्षीं असमाधानकारक रीतीनें शेवटास गेल्यावर पुढें विधिपक्षाचें कर्तव्य हें राहिलें कीं वादाच्या अशा गोंधळाच्या निकालामुळें लोकांच्या मनांत जो कांहीं उलट ग्रह झाला असेल तो काढून टाकणें. आंतल्या खांचा खोंचाकडे ज्यांचें लक्ष्य गेलें नाहीं अशा लोकांची तर अशीच समजूत झाली होती कीं पुनर्विवाह अशास्त्र ठरला व आतां हें प्रकरण अगदीं थांबलें. हा ग्रह बळकट होण्यास दुसरें असें कारण झालें कीं ज्या सात प्रमुख गृहस्थांस बहिष्कार घातला होता त्यांपैकीं रा. ब. गोपाळराव हरि देशमुख यांणीं त्यांच्या कन्येच्या

सासूनें पेंचांत* धरल्यामुळें ता. २२ मे १८७० रोजीं अहंमदाबादेस प्रायश्चित घेतलें. त्यांना पुनर्विवाहपक्ष त्याज्य वाटला ह्मणून त्यांणीं प्रायश्चित्त घेतलें असें नाहीं, पण सामान्य लोकांत अशीच समजूत पसरली व उलट पक्षाचे लोक देशमुखांची स्तुति करूं लागले. पण खरा प्रकार खुद्द देशमुखांनींच पत्रद्वारें विष्णु॰शास्त्री यांस कळविला व त्या पत्रांतील मुख्य भाग ता. ३० मे च्या इंदुप्रकाश पत्रांत छापिला होता. देशमुखांनीं जरी मी न॰ डीमुळें प्रायश्चित घेतलें तरी माझें मत कायम आहे व मी पूर्वीप्रमाणें सर्व प्रकारें साहाय्य करीत जाईन असें पत्रांत॰ लिहलें होतें. वा॰ स्तविक पहातां देशमुखांस जर अनुताप झाला नव्हता तर त्यांचें प्रायश्चितही व्यर्थ होतें. पण त्यांच्या विहणीची तेवढ्यानें तृप्ति झाली. जो वादविवाद झाला त्यावरून व विरुद्धपक्षाच्या कृष्ण कारस्थानावरून पुष्कळ लोकांचें पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेबद्दल अनुकूळ मत झालें होतें व तें लोक आपल्या सह्यांनिशीं प्रसिद्ध करूं लागले. २७ जूनच्या इंदुप्रकाशांत प्रथम ९१ सह्यांचें संमतिपत्र प्रसिद्ध झालें व त्या सह्या पुढें अडीचशेंवर गेल्या होत्या. पण लोकांत झालेला उलट ग्रह घालविण्यास प्रत्यक्ष पुनः एक पुनर्विवाहच व्हावयास पाहिजे होता. हा योग एक वर्षानें घडून आला. योग्य अशीं वधुवरें मिळून १८७१ सालच्या जून महिन्याच्या ६ वे तारखेस मुंबईस गोवाळी तळयावरील गोकुळदास तेजपाळ यांच्या संस्कृत पाठशाळेच्या बंगल्यांत हा विवाह झाला. व तेव्हांपासून पुनर्विवाहाचा प्रसार हळूहळू पण सतत चालू आहे. महाराष्ट्र लोकांत ही चाल सुरू झाल्याबरोबर गुजराथी लोकांनीं याबद्दल यत्न चालू केला. अहंमदाबाद एथें पुनर्विवाहोत्तेजक मंडळी स्थापन होऊन जे कोणी पुनर्विवाह करूं इच्छितील त्यांस विवाह घडून येण्याचे कामीं ती साहाय्य करूं लागली. मुंबईस कपोल वाणी ज्ञातीत प्रसिद्ध शेट माधवदास रघुनाथदास हे गृहस्थ पुढें येऊन त्यांणीं मुद्दाम ही चाल

---

*तुम्हीं प्रायश्चित्त घेऊन शुद्ध व्हा; नाहीं तर तुमच्या मुलीस मी आपल्या घरांत घेणार नाहीं व मुलाचें दुसरें लग्न करितें. दुसरी मुलगी तयार आहे. असा निरोप मुद्दाम मनुष्य पाठवून कळविल्यामुळें मुलीचें अकल्याण होतें या भीतीनें देशमुखांनीं प्रायश्चित्त घेतलें.

पाडण्याकरितां स्वतः आपल्या ज्ञातींतील श्रीमान व थोर कुटुंबांतलि एका गतभर्तृकेशीं लग्न केलें, व तेव्हांपासून या कामास त्यांजकडून पुष्कळ साहाय्य होत आहे. हल्लीं मुंबईस पुनर्विवाह होतात ते बहुतेक त्यांच्याच स्वतःच्या घरीं होतात. त्यांणीं गिरगांवांत जो नवा बंगला बांधिला आहे त्यांतील मुख्य दिवाणखान्यास त्यांणीं "पुनर्विवाहाकरितां दिवाणखाना "(Widow Marriage Hall) असें नांव देऊन ठेविलें आहे. आजपर्यंत त्यांच्या घरीं १०–१२ विवाह झाले आहेत. माहाराष्ट्र लोकांत आरंभीं जितकी तरतरी होती तितकी आज दिसण्यांत येत नाहीं, तरी जी कोणी मंडळी प्रथम अनुकूल होती ती आज विरुद्ध झाली आहे असें नाहीं. मुख्य मुख्य मंडळी जी बहिष्कृत झाली होती त्यांपैकीं चार गृहस्थांनीं कांहींना कांहीं नडीमुळें प्रायश्चित घेतलें. त्यांपैकीं एक जण अद्वैत वादी होऊन द्रव्यार्जनाशिवाय दुसरे सर्व विचार त्यांणीं सोडले आहेत असें दिसतें! दुसरे एक गृहस्थ परलोकवासी झाले आहेत, पण त्यांणीं आपल्या हयातींत प्रत्यक्ष साहाय्य जरीं केलेलें आढळलें नाहीं तरी त्यांची ह्या गोष्टीकडे अनुकूल दृष्टि होती. दोघे गृहस्थ हयात आहेत व त्यांच्या हातून होण्यासारखें साहाय्य ते करीत आहेत. प्रायश्चित्त न घेतां सातां पैकीं ३ गृहस्थ राहिले त्या पैकीं खुद्द शास्त्री बावा व रा. ब. विष्णु परशुराम रानडे हे परलोकवासी झाले. दोघाही गृहस्थांनीं अखेरपर्यंत आपला निश्चय कायम ठेविला होता. विष्णु शास्त्र्यांनीं तर मुख्यत्वें जनाचा दोष टाळण्यासाठीं उतार वय असतांही एका गतभर्तृकेशीं विवाह केला होता. प्रायश्चित्त न घेतां सातांपैकीं फक्त रा. ब. रानडे आज या कार्यास साहाय्य करण्यास राहिले आहेत. यांजवर या कार्यास फार उत्तम रीतीनें साहाय्य करण्याचा प्रसंग ईश्वरेच्छेनें आला होता, पण तो जरी यांणीं दवडला व ह्यामुळें हे अनेक लोकांकडून उलट टीका करून घेण्यास पात्र झाले व ह्यांच्या या कृत्यामुळें ह्या कार्यास बराच मोठा धक्का बसला, तरी मुळापासून तों आजपर्यंत यांचा या कामीं उद्योग सतत चालू आहे. कोणास विवाह कर्तव्य झाल्यास आज साहाय्य मागण्यास प्रसिद्ध असें हेंच एक स्थल आहे. पुनर्विवाहोत्तेजक मंडळीपैकीं इतर कित्येक गृहस्थांचेंही साहाय्य मिळत आहे. कित्येकांस जातीच्या लोकांकडून केव्हां केव्हां थोडा ब-

हुत त्रासही सोसावा लागत आहे, तरी त्यांचें लक्ष कमी होत नाहीं. शिवाय ज्या गृहस्थांनीं स्वतः पुनर्विवाह केले आहेत त्यांच्याकडून होईल तें अधिक साहाय्य ते करीत आहेत. अशा रीतीनें या कार्याचा क्रम हळु हळु पण सतत चालू आहे.

आजपर्यंत पुनर्विवाह किती झाले त्यांची यादी खालीं दिली आहे. तिजवरून एकंदर संख्या कळून दुसरी कांहीं माहिती मिळण्यासारखी आहे. पुनर्विवाहोत्तेजक मंडळी स्थापन होण्यापूर्वीं महाराष्ट्र लोकांत २ व गुजराथी लोकांत १ असे ३ पुनर्विवाह झाले होते असें मागें सांगितलेंच आहे. मंडळी स्थापन होऊन विशेष प्रसिद्धपणें विवाह होऊं लागले तेव्हां पासून महाराष्ट्र व गुजराथी लोकांत झालेल्या विवाहांच्या ह्या पुढील यादी आहेत.

## महाराष्ट्र लोकांतील झालेले विवाह.

१ वधू वेणूबाई वय १६ कोंकणस्थ ब्राह्मण वस्ती पुणें. वर **पांडुरंग विनायक करमरकर** वय २९ कोंकणस्थ ब्राह्मण वस्ती शहादें जिल्हा खानदेश. धंदा प्रथम मराठी स्कूलमास्तर नंतर हायकोर्टांत कारकून दरमहा प्राप्ति २९ रु. सन १८६९. एक पुत्र होऊन मृत झाला. हल्लीं उभयतांही परलोकवासी आहेत.

२ वधू कृष्णाबाई व. २० कोंकणस्थ ब्रा०. वर **वासुदेव बाबाजी नवरंगे** व. ३४ देवरुखे ब्राह्मण; धंदा व्यापार, दरमहा प्राप्ती सुमारें १००रु. सन १८६९. संतती २ पुत्र वय १४, १०. व ३ कन्या व. १६ ११, ८. पैकीं एक विवाहित. बाई परलोकवासी. हा विवाहविधि एकेश्वरमताप्रमाणें होऊन पुढें तो १८७२ च्या १ ल्या आक्टा प्रमाणें नोंदविला आहे.

३ भुलीबाई पाताणे परभू. वर रा. ब. **मोरोबा कान्होबा** दर म. प्रा० १२०० रु. स्माळकाज कोर्ट जज्ज-१८७०. उभयतां परलोकवासी. विवाहानंतर थोड्याच दिवसांनीं एकत्र बद्ध केलेलीं विहिरींत मृत आढळलीं. कोणीं तरी वैऱ्यानें हें कृत्य केलें असावें असा जबर संशय होता, पण तो उघडकीस आला नाहीं.

४ दुर्गाबाई वय १९ कोंक० ब्रा० **गंगाधर बाळकृष्ण गद्रे** व० २४ कों० ब्रा० धंदा इंग्रजी कारकून द.म.प्रा. २९ रु. सन १८७१.

संत. ३ कन्या वय १६, १४, ३, पैकीं एक विवाहित. २ पुत्र. वय ९, ५.

५ कोंडूबाई व. १३ देशस्थ ब्रा०, **गजानन पांडुरंग मोहरीर** वय ३७ देश० ब्रा० धंदा मराठी कारकून द. म. प्रा. रु. २० सन १८७३. संतती, २ कन्या होऊन मृत झाल्या.

६ कुसाबाई वय ३० कोक०ब्रा० **विष्णु परशुराम शास्त्री पंडित** वय ४७ कोक० ब्रा० इंदुप्रकाशाचे मालक द म. प्रा. अदमासें रु. २०० १८७४. शास्त्रीबोवा परलोकवासी १८७५.

७ गंगूताई वय २० गौड ब्राह्मण, **लक्ष्मण विठ्ठल भांडारी** व. २८ गौ० ब्रा० पोस्ट खात्यांत हेडकार्क द. म. प्रा. ६० रु. एक पुत्र वय ५.

८ गीताबाई वय १६ देशस्थ. ब्रा० **कृष्णाजी धोंडो पेंगे** व. २८ दे०ब्रा०सरकारी तारहपिसांत क्लार्क द. म प्रा. ७०रु. १८७४. संतती १ पुत्र ११. २ कन्या ३॥, १॥.

९ विठाबाई व. २० देशस्थ. ब्रा० **कृष्णाजी गोविंद पेंडसे** वय ३० कोक. ब्रा०धंदा शेती द. रु. अदमासें २५ रु.सन१८७४ बाई परलोकवासी. संत. १ पुत्र वय १०. (नंबर १४ पहा.)

१० वेणूबाई व. २५ देशस्थ ब्रा० **रंगो बाबाजी नवरंगे** देवरुखे ब्रा. व. ३५ फोटोग्राफर द. म. प्रा. अद०४० रु. १८७७. रंगोपंत परलोकवासी.

११ सखूबाई व. १६ देश.ब्रा. **दिनकर भिकाजी जोशी** व.३५ कोक. ब्रा० स्कूलमास्तर द. प्रा. रु. २०. १८७७ संतति १ पुत्र व० ११. २ कन्या व. ९, ४.

१२ दुर्गाबाई ऊर्फ उमाबाई व. १८ देश. ब्रा. **सदाशिव पांडुरंग केळकर** व. ३० को. ब्रा. विविंगमास्तर द.प्रा. १०० रु. १८७८ संत० ४ पुत्र १०, ८, ४, २. १ कन्या तान्ही. हा विवाहविधि एकेश्वरमतप्रमाणें झाला.

१३ भाऊताई व. २० देश. ब्रा. **बळवंत गोविंद गोडबोले** वय ३२ कोक. ब्रा. वकील दर प्रा.६०रु. १८७९. हा विवाहविधि एकेश्वर मताप्रमाणें झाला.

१४ गोदूबाई व. २० देश. ब्रा. कृष्णाजी गोविंद पेंडसे. (ह्याच गृहस्थांनीं पूर्वी ह्या यादींतील नवव्या विवाहांतील वधूशीं विवाह केला होता. ती परलोक वासी झाल्यावर पुनः हा दुसरा संबंध केला.) १८८०. ह्या संबंधापासून संतति २ कन्या ४, २. १ पुत्र तान्हा.

१५ तान्हूबाई व. २२ देश. ब्रा. द्वारकानाथ राघोबा तर्खडकर व.३५ वैश्य. हायस्कूल हेड मास्तर द.म. प्रा. २००.१८८१ बाई परलोकवासी संतति १ पुत्र वय ७. ( नंबर २० पहा. )

१६ गीताबाई व. १८ देश ब्रा. वामन महादेव कोल्हटकर वय ३४ कोक० ब्रा० एक्स्ट्रा अ. कमिशनर द. म. प्रा. ३००. १८८२. संतति २ कन्या ३–१.

१७ वेणूबाई वय २२ कऱ्हा. ब्रा. विष्णू विठ्ठल श्रीखंडे व.४७ कऱ्हा. ब्रा. हेड मास्तर नार्मल स्कूल द.म.प्रा. ६० रु.१८८४ बाई परलोकवासी संतति २ पुत्र. वय २ वर्षे व ९ महिने.

१८ यमुनाबाई व. १४ देश.ब्रा. रघुनाथ सीताराम आलुरकर व. २२ दे०ब्रा० विव्हिंग मास्तर द.म. प्रा.२५ रु०१८८४हा विवाहविधि एकेश्वरमताप्रमाणें झाला. संत०१ कन्या १ वर्षांची.

१९ काशीबाई व. २० देश. ब्रा. विष्णु आत्माराम वकील व. ४० दे. ब्रा० स्कूलमास्तर द. म. प्रा. ३० रु० १८८५.

२० नर्मदाबाई व.२०वैश्य. द्वारकानाथ राघोबा तर्खडकर (या यादींतील १५व्या विवाहांत हेच वर होते.तें कुटुंब निवर्तल्यामुळें हा दुसरा संबंध केला.) १८८४ संत.१ पुत्र वय ३. २ कन्या व. ४, १.

२१ गंगूबाई वय १८ कऱ्हा० ब्रा. वनमाळी लढ्ढा मोदी व० २० धंदा वर्तमानपत्रांस लिहिणें द. म. प्रा. २५ रु. १८८७ संत. १ पुत्र १॥ वर्षांचा

२२ सोनाबाई व० १५ दैवज्ञ.* कृष्णराव माधवराव चोनकर व० २१ दैवज्ञ. मेडिकल कालेजांतील विद्यार्थि. १८८९.

---

* ह्या ज्ञातींत आणखी तीन विवाह झाले आहेत पण ते विशेष प्रसिद्धीस आलेले नाहींत. प्रसिद्धपणें झालेला हा पहिलाच विवाह होय. पूर्वी झालेल्या

## गुजराथी लोकांत झालेले विवाह.

१ बाई धनकुवर बाई व. २१ कपोळवाणी वस्ती मुंबई. माधवदास रघुनाथदास कापडिया व. ३९ कपोळ वाणी. वस्ती मुंबई. रेशमी कापडाचे व्यापारी द. म. प्रा. शदमासें १००रु० १८७०. ह्या विवाहांतील वधू श्रीमान् घराण्यांतील असल्यामुळें व तिच्या संबंधी मनुष्यांची अनुकूलता नसल्यामुळें विवाह घडून येण्यास पुष्कळ युक्ती प्रयुक्ति योजाव्या लागल्या. गुजराथी लोकांतील प्रसिद्ध सुधारक शेट करसनदास मुळजी, ज्यांणीं विलायतचा प्रवास करून त्यावर एक मोठें पुस्तक लिहिलें आहे, त्यांची या कामीं मदत फार होती. बाई घरांतून जाऊन विवाह झाल्यानंतर ही बातमी तिच्या घरच्या मनुष्यांस समजली. बाईचे चुलते शेट वरजीवनदास माधवदास हे जातीचे प्रमुख असल्यामुळें त्या जातींत या विवाहामुळें फार चळवळ उत्पन्न झाली होती.

२ बाई शामकुवर व. २३ कपोळ वाणी. वस्ती काठिआवाड. मागजी लाळजी व० २२ वस्ती काठिआवाड, भावनगर. धंदा दुकानदारी द. म. प्रा. १९ रु० १८७२.

३ बाई जिवकुवर व. १७ विसा खडाइता वाणी. वस्ती भडोच. लल्लुभाई व. २९ विसा खडा० वा० वस्ती नडियाद. स्कूलमास्तर द. म. प्रा. २९ रु० ( हल्लीं विनिंग मास्तर ) १८७२. जिवकुवरबाई ही विवाहापूर्वी मुलींच्या शाळेवर शिक्षकीण होती. ती पुनर्विवाह करणार अशी बातमी तिच्या संबंधी मनुष्यांस कळतांच त्यांणीं तिचें जुलमानें वपन करून तिला एका खेडे गांवांत नेऊन लपवून ठेविली. तिणें युक्तीनें ही खबर गांवच्या अधिकाऱ्यास कळवून आपली सुटका करून घेतली व जुलमानें वपन करणारांवर फिर्याद करून त्यांस शिक्षा झाली. नंतर विवाह झाला.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

तीन विवाहांतील वरांचीं नांवें रा. ब. जगन्नाथ सदाशिवजी हाटे, रा. रा. जगन्नाथ बापूजी कोटकर ( हाटे ) व रा. रा. नानाभाई हरिश्चंद्र हाटे अशीं आहेत. नानाभाई यांच्या कुटुंबाचें नांव पुतळाबाई असें आहे. वरकड माहिती वेळेवर हातीं आली नाहीं.

४ बाई दिवाळी बाई व. १८ दसावळ केवळदास अमरजी व. २५ दशा खडाइता वस्ती अहंमदाबाद स्कूलमास्तर द. म. प्रा. १५ रु. १८७४. बाई परलोकवासी.

५ बाई जडाव बाई वः २३ विसा श्रीमाळी वाणी. ललु भाई खुशालचंद व. ३० विसा श्री.वा. दुकानदार १८७५. ललु० मृत

६ बाई गंगा बाई व. ३० दशा लाड वाणी मोती बापूजी व, ४५ खडाइता वाणी वस्ती डाकोर दुकानदार १८७५.

७ बाई दिमत बाई व. २१ दशा ओसवाळ लालजी हालधर व. ३० द. ओ. वस्ती कच्छ. धान्याच्या व्यापाऱ्यांचा मुनीम. १८७८.

८ बाई तेजण बाई व. २५ दशा ओसवाळ देवजी रामजी व. ३४ द. ओ. वस्ती कच्छ दुकानदार १८७९.

९ बाई फुल बाई व २७ दशा श्रीमाळी ब्राह्मण कानजी देवजी व. ३२ द. श्री. ब्रा. दुकानदार १८७९.

१० बाई माणक बाई व. २४ मोडवाणी दामोदर देवचंद व २८ मोड वाणी वस्ती काठियावाड वकील १८७९ दामोदर मृत.

११ बाई रेवा बाई व २२ वाणी. गोवर्धनदास लालभाई व. ३५ नागर. वस्ती अहंमदाबाद सराफ. १८८०.

१२ बाई दिवाळी बाई खेडावळ ब्राह्मण. जेठाराम खे. ब्रा. वस्ती नडियाद १८८०.

१३ बाई ओनजी बाई व. २० खेडा. ब्रा. भाई शंकर व २४ खे. ब्रा. वस्ती नडीयाद शिपाई. १८८०.

१४ बाई डाही बाई व. २५ भाटे. चतुर्भुज कहानजी व. ३२ भाटे व. कच्छ वकील १८८२.

१५ बाई मानकुंवर बाई व. ३६ दशा श्रीमाळी. बावनजी गोवर्धन व० २६ मोड वाणी वस्ती काठिआवाड जुनागड संस्थानांत नौकरी १८८२.

१६ बाई जमनाबाई व. २८ प्रेमजी व. ४० श्रीमाळी ब्रा. व. काठिआवाड उपाध्येपण १८८२.

१७ बाई माळबाई व. २० दशा ओस्वाळ वाणी. दामजी रतनसी व. ४० द. ओ. वा. वस्ती कच्छ. व्यापारी १८८२.

१८ बाई लक्ष्मीबाई व. २५ दशा श्रीमाळी महासुकराम सुरचंद व. ३४ द० श्री० दुकानदार १८८२.

१९ बाई रामथाबाई व. २५ दशा श्रीमाळी वाणी. नाथजी गोपाळजी व. ३० द० श्री० वा० वस्ती काठिआवाड दुकानदार.

२० बाई जमनाबाई व. १७ औदीच्य ब्राह्मण. हिंमतलाल दलसुखराम व. २४ औ० ब्रा. वकील वस्ती बडोर्दे १८८३.

२१ बाई महालक्ष्मी बाई व. १७ मोड चतुर्वेदी ब्रा. जमीयतराम जीवनराम व. २७ औदीच्य ब्रा० देशी वैद्य. सन १८८६.

२२ बाई कृष्णा बाई व. २२ औदीच्य ब्रा. धीरजराम जीवनराम व. २४ उपाध्याय १८८७

२३ बाई मावाकुवर बाई व. १४ औदीच्य ब्रा. जयशंकर औदी० ब्रा. पेंटर १८८७.

२४ बाई गंगाबाई व. २१ दशापोरवाड. लालदास नरोत्तम दास व. ३० वायड वाणी म्युनसिपल सेक्रेटरी गोंडल, १८८८.

२५ बाई नंदु बाई व. २२ दशा श्रीमाळी वाणी. मोतीचंद व. २८ द. श्री. वा. व्यापारी १८८८.

या शिवाय अहंमदाबाद, वीरमगांव,व धंदुका,या ठिकाणीं निरनिराळ्या गुजराथी लोकांत सुमारें ७–८ पुनर्विवाह झाले आहेत, पण त्यांची माहिती वेळेवर हातीं आली नाहीं. यामुळे ती एथें देतां आली नाहीं.

वरील यादीवरून सहज ध्यानांत येईल कीं पुनर्विवाहाबद्दल विशेष चर्चा सुरू झाल्यापासून आजपर्यंत ९०–९५ विवाह या प्रांतांत झाले आहेत. यांशिवाय बंगाल व मद्रास या इलाख्यांतही या विषयाबद्दल चर्चा चालू आहेच. बंगाल देशांत ब्राह्मसमाजाचा प्रसार पुष्कळ होऊन सुधारक लोकांचा भरणा याच समाजांत असल्यामुळे जे पुनर्विवाह होतात ते ब्राह्म लोकांतच होतात. मद्रासेकडे हा उद्योग अलीकडेच सुरू झाला आहे. तरी १०, १२ विवाह तिकडे झाले

आहेत. तेव्हां या सुधारणेच्या मार्गाचें पाऊल कितीसें पुढें पडलें आहे असें जे कोणी केव्हां केव्हां विचारितात त्यांस उत्तर देण्यास कांहींच जागा नाहीं असें नाहीं. जेवढे विवाह झाले यांहूनही अधिक झाले असते तर बरेंच झालें असतें, पण या अधिक किंवा उण्या संख्येचा विचार दोन प्रकारचा आहे. या सुधारणेपासून सर्व देशाचें हित किती झालें अशा दृष्टीनें पाहिल्यास तें विवाहांच्या कमी जास्त संख्येवर अवलंबून आहे. पण व्यक्तिमात्राचें हित संख्येवर अवलंबून नाहीं. संख्या लहान असो कीं मोठी असो व्यक्तीचा लाभ सारखाच. या दृष्टीनें पहातां आज १० विधवांस "तुह्मांस ह्या सुधारक मंडळीच्या उद्योगापासून किती लाभ झाला" असें विचारिल्यास त्यांचें उत्तर किती संतोषप्रदर्शक येईल हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. बुडत्या नावेंतील हजार मनुष्यें तारण्यास जाण्याऱ्यांच्या हातून एक मनुष्य जरी बचावलें तरी त्यास त्या लोकांच्या यत्नाचें किती बरें महत्व वाटेल? मृत्यु आणि जीवित यांमधील अंतर तितकेंच त्यांनीं यत्न न करणें आणि यत्न करणें यांतील अंतर त्यांस होय. आज ज्या १०-११ अबला वैधव्यदुःखांतून मुक्त झाल्या त्या खचित ह्मणतील कीं, "आमच्या इतर भगिनी कांहींही ह्मणोत पण आह्मी तर या सुधारक मंडळीच्या यत्नानें मृतावस्थेंतुन किंवा तिच्याहीपेक्षां दुःखमय स्थितींतून सुटून दुसऱ्या सुखाच्या जन्मांत आलों यांत संशय नाहीं! या मंडळीच्या उपकाराबद्दल आह्मीं जेवढी कृतज्ञता दाखवूं तेवढी थोडीच होणार आहे!"

आतां या सुधारणेच्या गोष्टीचें पाऊल अधिक जोरानें कां पडत नाहीं; व तें पडण्यास इलाज काय एवढेंच पहाण्याचें शिलकी राहिलें आहे. या प्रकारच्या उद्योगाचे प्रकार दोन. एक लोकांस या गोष्टीची अवश्यकता किती आहे हें दाखविणें व दुसरा ज्यांस या गोष्टीची अवश्यकता दिसून आली आहे त्यांनीं ती अमलांत आणणें. लोकांत प्रसिद्धीच्या संबंधानें पहातां जरी या गोष्टीची प्रसिद्धि बरीच झाली आहे, तरी पुष्कळ लोकांस ह्याबद्दल असावी तशी माहिती नाहीं. पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेबद्दल अधिक शोध व्हावयास पाहिजे आहे किंवा अधिक पुस्तकें व्हावयास पाहिजे आहेत असें नाहीं. शास्त्रविचाराचें काम ईश्वरचंद्र विष्णुशास्त्री प्रभृतींनीं बरेंच करून ठेविलें आहे. शास्त्रीबोवांच्या मृत्यूपासून आलीकडे या बाबतींत नवीन यत्न झाला नव्हता.

पण नुकतेच परलोकवासी झालेल्या रा.रा. **कृष्णराव गोळवलकरांनीं** ह्या उद्योगास **विधवादुःख निवेदन** आणि **पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीं विचार** नामक पुस्तक करून ताजेपणा आणून ठेविला आहे. पुनर्विवाहास जितके शास्त्राधार आढळण्यांत आले होते, त्या सर्वांचा ह्यांत व्यवस्थित रीतीनें संग्रह केला आहे. पुस्तक होईल तेवढें सुबोध करून त्याची किंमतही अल्पच ह्मणजे सारी चार आणे ठेविली आहे. हीं पुस्तकें अद्यापि एथील सुबोधप्रकाश छापखान्यांत पुष्कळ मिळण्यासारखीं आहेत. तरी लोकांत फुकट वांटण्याकरितां लहान लहान पत्रकें वगैरे निघावयास पाहिजे आहेत व हें काम त्या पक्षाच्या अभिमानी गृहस्थांनीं लवकर लक्ष्य पोंचविण्यासारखें आहे. चोंहोंकडे हिंडून व्याख्यानादिद्वारा या गोष्टीची लोकांत माहिती करून देण्याचेंही काम व्हावयास पाहिजे आहे.

लोकांत ह्या गोष्टीची प्रसिद्धी करण्याचा उद्योग जरी अजून व्हावयास पाहिजे आहे, तरी त्याहूनही आतां दुसऱ्या गोष्टीची ह्मणजे ज्यांस ह्या गोष्टीची अवश्यकता समजून आली आहे त्यांणी ती प्रचारांत आणणें ह्या गोष्टीची विशेष जरूरी आहे. नुसतें ज्ञान झालें व त्या प्रमाणें क्रिया झाली नाहीं तर त्या शुष्क ज्ञानाचा काय उपयोग? क्रियेच्या संबंधानें पहातां प्रस्तुत स्थिति असावी तशी नाहीं. ज्यांणीं ज्ञानाप्रमाणें क्रिया करावी अशी अपेक्षा धरणें योग्य आहे, त्यांपैकीं बहुतेकांचें वर्तन उलट दिसतें. प्रत्येक जण दुसऱ्यास दोष देण्यास तयार असतो, पण स्वतःच्या जबाबदारीचा विचार करीत नाहीं. जनरीतीच्या उलट आचरण करणारांस, तें आचरण वस्तुतः कितीही शुद्ध असलें तरी, थोडा फार त्रास सोसावा लागतोच. हा त्रास सोसण्यास तयार होणारीं फारच थोडीं मनुष्यें आढळतात. जो, तो, आपल्या स्वतःच्या सोयीकडे पहातो. पण ही आपली दुर्बलता कबूल करून स्वस्थ बसणेंही कित्येकांस खपत नाहीं. आपण जसे काय सर्वथा दोषमुक्त असून सर्व दोष दुसऱ्याच मंडळीचा आहे असें हे दाखवीत असतात. "अमुक एका पुढारी गृहस्थानें प्रसंगानुरूप आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं यामुळें या कार्याचा सगळा घात झाला" असें ह्मणणारे आज शेकडों लोक आढळतात, परंतु आपल्या स्वतःवर कांहीं जबाबदारी आहे किंवा नाहीं हा विचार करणारे व "दुसरे कांहीं करोत, आपण आपल्या कर्तव्यास जागणार"

असें ह्मणणारे लोक फार क्वचित आढळतात. पुनः दुसऱ्या चांगल्या मनुष्याचें उदाहरणच पाहिजे असेल तर जो आपल्या कर्तव्यास जागला नाहीं, त्याचें उलट उदाहरण घेण्यापेक्षां ज्यांणीं ज्यांणीं अनुकूल अशीं उदाहरणें दाखविलीं आहेत त्यांचें अनुकरण करण्यास या मंडळीस काय हरकत आहे ? ह्या बाबतींत दुसऱ्यास नांवें ठेवण्याचा आणखी एक प्रकार आढळतो तो असा कीं, आजपर्यंत जे पुनर्विवाह झाले ते जशा व्यवस्थेनें व्हावयास पाहिजे होते तसे झाले नाहींत. कित्येक विवाहांत मुहूर्त पहाण्यांत आले नाहींत, कित्येकांत गणगोत्रादिकांचा विचार झाला नाहीं, कित्येकांत जातिनिर्बंध पाळण्यांत आले नाहींत, इत्यादि इत्यादि. पण ह्या गोष्टी पाळणें न पाळणें हा व्यक्तिविशेषाचा विचार आहे; हा सामान्य सिद्धांत नव्हे. पुनः जुन्या पद्धतीस सोडून कांहीं विवाह झाले आहेत,तसे कांहीं अगदीं जुन्या पद्धती प्रमाणेंही झाले आहेत. मग एथेंही प्रतिकूल उदाहरणांची हरकत काढण्यापेक्षां अनुकूल उदाहरणांचें अनुकरण कां करूं नये? बरें आजपर्यंत झालेल्या विवाहांत गणगोत्राचा निर्बंध राखण्यांत आला नसला तरी ज्यांस तो राखावासा वाटत असेल त्यांणीं तो राखण्यास आज कोणाचा प्रतिबंध आहे? पुनर्विवाह ठरविण्याचें किंवा त्यांचा विधि चालविण्याचें सरकारांतून कोणी पेटंट थोडेंच घेतलें आहे! पण स्वतःच्या कर्तव्याची शुद्धि कोण राखतो? दुसऱ्यास दोष देऊन आपण आपले नामानिराळे रहाण्याची सोपी युक्ती सोडून एवढ्या प्रयासांत कोण पडतो ? पण अशा रीतीनें कोणतेंच कार्य उदयास येणार नाहीं. प्रत्येक मनुष्य जर आपल्या मनुष्यपणाची किंमत ओळखील व दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याचें सोडून देऊन आपल्या कर्तव्यास जागेल, तरच कोणत्याही सुधारणेचें पाऊल पुढें पडेल.

आजपर्यंत झालेल्या पुनर्विवाहांच्या संबंधानें आणखी एक अत्यंत अविचाराचा आरोप करण्यांत केव्हां केव्हां येतो. असला आरोप कोणीही सभ्य गृहस्थ करणार नाहीं. ज्यांस आपल्या कृत्याची जबाबदारी कांहींच वाटत नाहीं, असले लोक जें तोंडास येईल तें बकत असतात. याकरितां असल्या आरोपाकडे विशेष लक्ष देण्याचें कारण नाहीं. तथापि ज्यापेक्षां हा आरोप प्रसिद्धपणें करण्यांत येतो, त्यापेक्षां त्याच्या योग्यते-

विषयीं ह्या निबंधांत दोन शब्द लिहिणें अवश्य दिसतें. आरोप होत असतो तो हा कीं ज्या कोणी स्त्रिया पुनर्विवाह करतात त्या चांगल्या सभ्य, कुलीन, अशा नसतात. सभ्दतेचें व कुलीनतेचें माप जर श्रीमंतीवर धरलें तर मात्र ह्या आरोपास जागा मिळेल. कारण मोठ्या श्रीमान घराण्यांतील स्त्रियांनीं पुनर्विवाह केल्याचीं उदाहरणें जरी कांहीं आहेत तरी तीं फार थोडीं आहेत. पण गरिबीची स्थिति ही तर स्त्रियांस पुनर्विवाह करण्यास विशेष कारण असते. श्रीमान विधवा स्त्रीस निदान पोटापाण्याची तरी काळजी नसते. तेव्हां तिणें पुनर्विवाह न केल्यास आश्चर्य नाहीं. गरीब स्थितींतीलच स्त्रिया पुनर्विवाह करण्यास प्रथम सिद्ध व्हावयाच्या. पण श्रीमान नव्हेत तितक्या सगळ्या असभ्य, अकुलीन असा भलताच अर्थ करण्यास काय आधार आहे? सभ्यता व कुलीनता ह्यांचें लक्षण केवळ चांगली चालचलणूक होय. श्रीमंती नव्हे. ह्या दृष्टीनें पहातां आजपर्यंत झालेल्या सर्व पुनर्विवाहांतील स्त्रियांवर असला आरोप करण्यास मुळींच जागा नाहीं. साधारण दहा माणसांची जशी चालचलणूक असते तशीच या स्त्रियांची पुनर्विवाहापूर्वींही होती व आतां आहे. ह्या अगदीं निवडून उत्तम ठरविलेल्या नव्हत्या किंवा नाहींत व निवडून वाईट निघालेल्याही नाहींत. चालचलणुकीच्या संबंधानें दुसरा विचार असा केला पाहिजे कीं, वैधव्य स्थितींत असतां एखाद्या स्त्रीकडून जरी एखादे वेळ वाकडें पाऊल पडलें असलें तरी त्याचा एवढा बाऊ करण्याचें कारण नाहीं. असा प्रकार होणें अगदीं साहाजिक आहे. असा प्रकार होतो ह्मणून तर पुनर्विवाह करण्याची विशेष अवश्यकता. पुनर्विवाह करण्याची मोकळीक असतां जर कोणी विधवा स्त्री विवाह न करितां गैर मार्गानें चालेल तर ती मात्र अधिक दोषास पात्र खरी, पण पुनर्विवाहाचा जेथें प्रतिबंध आहे तेथें असा प्रकार घडल्यास आश्चर्याची गोष्ट नाहीं. पुन: हा आरोप करतांना आमच्या पुरुषांची काय स्थिति आहे तिचाही विचार केला पाहिजे. स्त्रिया वाईट मार्गास जातात त्या वाईट पुरुषांच्या सहवासानें जातात. तेव्हां जोंपर्यंत सर्व समाजच सुधारला नाहीं, तोंपर्यंत नुसत्या बिचाऱ्या विधवा स्त्रियांसच दोष लावून कसें चालेल? असो. ह्या गोष्टीची अधिक चर्चा करण्याचें कारण नाहीं. जर कोणी वाकड्या वाटेनें गेल्या असतील तर त्यांच्या दोषाचें मान बरोबर

रीतीनें लक्ष्यांत यावें ह्मणून आह्मीं दोष दृष्टी कमी करण्याचीं कारणें सांगितलीं. पण अशा दोषास पात्र असणाऱ्या स्त्रियांचीं उदाहरणें आजपर्यंत झालेल्या विवाहांत असलीं तर फार विरळ असतील. ज्यांच्या वर्तणुकीबद्दल कांहींभरही संशय घेण्यास जागा नाहीं अशींच उदाहरणें पुष्कळ सांपडण्यासारखीं आहेत.

आणखी दुसरा एक असाच आरोप करण्यांत येत असतो. पण त्यांत तो करणारांच्या मूर्खपणाशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट लक्ष देण्यासारखी नाहीं. तो आरोप हा कीं स्त्रियांचे पुनर्विवाह होतात ते त्यांच्या इच्छे विरुद्ध जुलमानें होतात. याविषयीं आह्मीं एवढेंच ह्मणतों कीं असें एकही उदाहरण आजपर्यंत घडलेलें नाहीं. जर कोणापाशीं ह्या आरोपास कांहीं आधार असेल तर त्याणें तो पुढें आणावा. स्त्रियांचे पुनर्विवाह जुलमानें केले ही गोष्ट तर अगदीं खोटी आहे, पण स्त्रिया पुनर्विवाह करण्यास खुषी असतां संबंधी मनुष्यांनीं उलट मध्यें विघ्नें आणलीं अशीं उदाहरणें मात्र पुष्कळ आहेत. आईबाप वगैरे मंडळीची पूर्ण अनुकूलता असून त्यांणीं स्वतः मुलीचा प्रसिद्धपणें विवाह केला अशीं कांहीं स्तुत्य उदाहरणें आहेत. प्रसिद्धपणें नाहीं, पण आंतून संमती दिली व कोणतीही अडचण आणली नाहीं, अशींही कांहीं उदाहरणें आहेत. पण आईबाप, भाऊ, सासूसासरे, दीर यांची प्रतिकूलता असल्यामुळें मुलीस मोठ्या युक्तीनें प्रयत्नानें आपली इच्छा ह्या कार्याच्या साहाय्यकर्त्यांस कळवावी लागली व वेळ आली तेव्हां घरांतून गुप्तपणें निघून यावें लागलें अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. कोणा मुलीस कशा अडचणी आल्या व ती कोणत्या युक्तीनें पुनर्विवाहोत्तेजक मंडळीकडे आली याची हकीकत लिहूं लागल्यास ती फार मोठी व तितकीच मनोरंजकही होईल. पण स्थलसंकोचास्तव ती आह्मांस ह्या निबंधांत देतां येत नाहीं. पण या संबंधाचा विशेष संतोषकारक भाग आहे तेवढा मात्र एथें सांगतो. तो हा कीं, जीं आईबापें, किंवा भाऊबहिणी प्रथम अगदीं विरुद्ध होतीं, तीं कांहीं दिवसांनीं आपल्या मुलीस किंवा बहिणीस विवाहानंतर सुखाच्या स्थितींत पाहून संतुष्ट होऊन मुलीशीं पूर्वीप्रमाणें प्रेमानें वर्तन करूं लागलीं, अशाचीं पुष्कळ उदाहरणें घडलीं आहेत. याचें कारण उघडच आहे कीं, पुनर्विवाह ही गोष्ट केवळ रूढीस विरुद्ध असल्यामुळें लोक प्रथम जनापवादास

मितात, पण एकदां विवाह होऊन गेला ह्मणजे लोकांची भीति हळू हळू कमी होऊन त्या गोष्टीचें खरें स्वरूप उदयास येतें.

कित्येक लोकांचा आणखी एक आरोप असा असतो कीं पुनर्विवाह करावयाचे ते लहान अल्पवयी ८–१० वर्षांच्या किंवा फार तर १२–१४ वर्षांच्या वयाच्या अशा विधवा मुलींचे करावे. २० वर्षांच्या, २५ वर्षांच्या विधवा "घोड वधूंचे" विवाह तुह्मी करितां यामुळें ते लोकांस मान्य होत नाहींत. हा आक्षेप प्रथम दर्शनीं योग्य दिसतो खरा, पण थोडा अधिक विचार केल्यास त्यांत कांहींच अर्थ नाहीं, तो अगदीं चुकीचा आहे असें दिसतें. ८–१० किंवा १२–१४ वर्षांच्या मुलीस वैधव्य आलें असतां लोकांस तें फार भयंकर वाटतें खरें, पण वास्तविक पहातां वैधव्याचा खरा भयंकरपणा आहे तो विधवांच्या अल्प वयांत कळत नाहीं; तो त्या प्रौढ दशेंत आल्यावर त्यांच्या अनुभवास येतो. कित्येक ज्ञातींत ६ महिन्यांच्या मुलीचाही विवाह करितात व केव्हां केव्हां थोड्या च काळानें ती विधवा होते. पण सौभाग्य किंवा वैधव्य यापैकीं एक तरी गोष्ट त्या अर्भकाच्या गावीं असते काय? ८ व्या १० व्या वर्षी वैधव्य प्राप्त झालेल्या मुलींचीही स्थिती अशीच असते. तेव्हां ज्यांची खरोखर दुःखाची स्थिति त्यांच्या दुःखनिवारणाचा विचार एका बाजूस ठेवावयाचा व ज्यांस त्या दुःखाचा अनुभव अद्यापि नाहीं, त्यांच्या दुःखपरिहाराचा यत्न करावयाचा यांत काय शहाणपणा? जर या आक्षेपांत खरोखर अर्थ असता तर मग तो पुरुषांच्या पुनर्विवाहास-ही लागू करावयास पाहिजे होता. ह्मणजे १०–१२ वर्षांच्या मुलाची बायको वारली तर त्याचें मात्र पुनः लग्न करावें; २५–२५, ३०–३०, वर्षांच्या "घोडवरांचे" पुनः विवाह कशाला पाहिजे होते? पण वास्तविक पहातां पुरुषांस ५०, ६०, व्या वर्षी जरी विधुरत्व आलें तरी त्यासही पुनर्विवाह करावासा वाटतो. विवाह न केला तरी दुसरी कांहीं चोरटी व्यवस्था तरी कित्येक करितात. मग स्त्रियांच्या संबंधानेंच असा उलटा नियम करण्यास काय आधार आहे? पुरुषानें किंवा स्त्रीनें पुनर्विवाह कोणच्या अवधींत करावा याविषयीं नियम करूं गेल्यास ज्याला ज्या वयापर्यंत विवाह करावासा वाटेल त्याणें त्या वयांत करावा हाच साधारण नियम; यांत जुलमाचा भाग मुळींच नसावा. अमुक वयानंतर

विवाह करूंच नये, किंवा अमुक वयाच्या आंत केलाच पाहिजे असा कांहींच निर्बंध करण्याचें विशेष कारण नाहीं. स्त्रीच्या व पुरुषाच्या वयांत मात्र मेळ असावा. हा मेळ राखिल्यावर एखाद्या ८० वर्षांच्या मुलानें एखाद्या ७० वर्षांच्या मुलीशीं जर विवाह केला तर त्यांत कोणाचें काय बिघडलें ! बिचारीं खुशाल करीनात !! वास्तविक पाहिलें तर ६० वर्षांनंतर पुरुषानें किंवा ४० वर्षांनंतर स्त्रीनें पुनः विवाह करण्यांत कांहीं शहाणपण नाहीं. ज्या स्त्रीस मुलें असतील ती तर पुनर्विवाहाची गोष्टही मनांत आणणार नाहीं. पण ज्यापेक्षां मुलेंबाळें झालेल्याही स्त्रिया वाईट मार्गानें जाणाऱ्या केव्हां केव्हां आढळतात, त्यापेक्षां त्यांस विवाहाचा राजमार्ग उघडा ठेवणें हेंच बरें दिसतें.

देशांत प्रजा अधिक होत चालली आहे, ती पुनर्विवाहाचा प्रचार पडल्यानें फारच वाढेल व खाण्यास अन्न मिळण्यास मारामार पडेल या करितां पुनर्विवाहाचा प्रचार पाडूं नये असें ह्मणणारे ही कित्येक तत्वज्ञ पुरुष आहेत. यांच्या या तत्वज्ञानावर आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, देशांतील प्रजा कमीच करावयास पाहिजे असेल, वाढणाऱ्या प्रजेच्या पोटास मिळण्याचें साधन कांहींच सांपडत नसेल तर प्रजावृद्धीस प्रतिबंध करा. मात्र त्यांत पक्षपात करूं नका. स्त्रियांच्या पुनर्विवाहास जसा प्रतिबंध करितां तसाच पुरुषांच्या पुनर्विवाहासही करा. सर्वच पुरुषांचे पुनर्विवाह स्त्रियांच्या पुनर्विवाहाप्रमाणें सर्वथा बंद करा. नाहीं तर कांहीं मर्यादेपर्यंत उभय पक्षांस मोकळीक ठेवा व त्या मर्यादेनंतर दोन्ही पक्षांस प्रतिबंध करा. अशी न्यायाची व्यवस्था करीपर्यंत मात्र आपल्या तत्वज्ञानाचा अंमल बजावण्यास जाऊं नका. सहज हेंही सूचवून ठेवितों कीं, पुनर्विवाहाचा प्रतिबंध किती लोकांत आहे व त्याणें प्रजावृद्धीस प्रतिबंध कितीसा होईल याचाही विचार करा.

पुनर्विवाहाचा प्रचार सुरू झाल्यास पोळया भाजण्यास बाया कशा मिळतील ही शंका आतां बरीच मागें पडली आहे असें दिसतें! कारण एक तर पोळयांची जागा हल्लीं लाडू जिलब्यांनीं घेतली आहे !! तेव्हां तें काम आचाऱ्यांवर भागण्यासारखें आहे. शिवाय हल्लीं पुरुषांस तरी दुसरे उद्योग कोठें आहेत !! असो.

शंकराचार्यांनीं पुनर्विवाह अशास्त्र ठरविल्यामुळें पुनर्विवाहित दंपती व त्याचे संसर्गी यांस ज्ञातिबहिष्कृत समजतात, तरी ज्ञातीच्या लोकांपासून यांस विशेष त्रास होतो असें नाहीं. आपण होऊन भांडण उकरून काढणारांस कांहीं प्रसंगीं त्रास झाला आहे, पण जे कोणाच्या वाटेस न जातां आपलें कर्तव्य करून सरळ मार्गानें जातात त्यांस ज्ञातीकडून विशेष त्रास पोंचला असें फारसें आढळण्यांत आलें नाहीं. प्रसंगीं जरी कोणी त्रास देऊं लागले, तरी कांहीं दिवस तो मुकाट्यानें सहन करून आपला दृढ निश्चय कायम ठेवणारांस लोक आपोआप त्रास देण्याचें बंद करितात. लोकांस भिऊन जे त्यांच्या मर्जीप्रमाणें वागावयास जातात त्यांस मात्र लोक अधिकाधिक आपल्या दाबांत ठेवण्यास जातात. न भिणारांचें कोणी कांहीं करूं शकत नाहीं. पण या गोष्टीची दुसरी दृष्टि अशी आहे कीं, लोकांकडून त्रास होत नाहीं हें चांगलें नाहीं. एका बाजूनें आघात झाल्यास दुसरीकडून प्रत्याघात होऊन जें अधिक कार्य होतें तें या लोकांच्या स्वस्थतेमुळें घडत नाहीं. ज्या मानानें पुनर्विवाहितांस त्रास देणारे उत्पन्न होतात, त्याच मानानें त्यांचे कैवारीहि अधिक वाढतात. तेव्हां लोकांपासून त्रास न होणें हें जितकें इष्ट आहे तितकेंच अनिष्टही आहे.

एथपर्यंत आजपर्यंत या बाबतींत झालेला यत्न व त्याचें फळ सांगितलें. लोकांचे जे क्षिप्रक आक्षेप आहेत त्यांचेंही थोडक्यांत निराकरण केलें. यावरून आज मितीस ह्या सुधारणेच्या उद्योगाचें काय स्वरूप आहे, हें वाचकांच्या बरेंच लक्ष्यांत येईल अशी आशा आहे. आज रिकाम्या जनापवादाच्या भीतीशिवाय दुसरी कोणतीही अडचण राहिली नाहीं. जे भितात ते मागें बसतात व जे भीत नाहींत ते सहज पुढें निघून जातात ही प्रस्तुतची स्थिति आहे. सर्व शक्तिमान् परमात्मा ही मिथ्या भिती दूर करून आमच्या देशबांधवांस ह्या परदुःखनिवारणाच्या अत्यंत महत्वाच्या कामीं धैर्य देवो अशी त्याची प्रार्थना करून आम्ही हा निबंध संपवितों.

मागें जो जुना ग्रंथ पहाण्यांत आला ह्मणून सांगितलें तो तेथें सुचविल्याप्रमाणें त्याच्या पुनरुज्जीवनार्थ पुढें दिला आहे. याचे कर्ते परलोकवासी वे. शा. विष्णुशास्त्री बापट (रा.सा. नारायण विष्णु बापट माजी क्युरेटर ग. सें. बुकडीपो यांचे वडील) हे होत असें शोधा अंतीं कळून आलें आहे. इंदुप्रकाश पत्राच्या १८६९ च्या एका अंकांत पुनर्विवाहावर झालेल्या कित्येक ग्रंथांची यादी दिली आहे तिजवरून वरील माहितीस बळकटी येते. ती यादी अशी:—

१ **पुनर्विवाह प्रकरण**. कर्ते बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर व गंगाधरशास्त्री फडके.

२ **पुनर्विवाह प्रकरण** कर्ते **विष्णुशास्त्री बापट** सन १८४१.

३ **कन्या पुनर्विवाह विषये** कर्ते दलपतराम डायाभाई १८४८.

४ **पुनर्विवाहाविषयीं विचार** क० विष्णुबावा ब्रह्मचारी.

५ मोरोबा कान्होबा यांणीं केलेला एक ग्रंथ १८६३.

६ **सौभाग्यरत्न** क० लोकहितवादी १८६४ अहंमदनगर.

७ विधवा विवाह, ८ विधवाविवाह खंडन, ९ पुनर्विवाहनिषेध, १० विधवोद्वाहविवेक.

On the

SECOND MARRIAGE
OF
THE WIDOWS OF BRAHMANS.

# ब्राह्मण जातीच्या

## विधवा कन्येचे पुनर्विवाहाविषयीं प्रकरण.

इसवी सन १८४१

## प्रस्तावना.

### पुनर्विवाहप्रकरणीं.

या हिंदुस्थानामध्यें ज्या जातींत पुनर्विवाह नाहीं, त्या जातींत बालविधवा ज्या होतात, त्या व्यभिचार, गर्भपात, बालहत्या, वर्णसंकर असें

पापकर्मे करितात, कोणी तर भलत्याचेच घरीं जाऊन शिरतात. त्याला घेऊन पळूनही जातात. तरीं ह्या बऱ्या, कां कीं, आपणच जातिभ्रष्ट होतात, परंतु वर्णसंकर करीत नाहींत. ज्या कांहीं गुप्त पाप करितात त्या तर कुलासच भ्रष्ट करितात. त्यांजकडेसच अन्याय ह्मणावा तर "बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति" ह्मणून पुरुष विद्वान विवेकी असून तोही बहुधा इंद्रिय निग्रह करूं शकत नाहीं. यथाह भर्तृहरिः

"सन्मार्गे तावदास्ते प्रभवति च नरस्तावदेवेंद्रियार्थे लज्जां तावद्विध-"
"त्ते विनयमपि समालंबते तावदेव ॥ भ्रूचापाकृष्टमुक्ताः श्रवणपथ"
"गता नीलपक्ष्माण एते यावल्लीलावतीनां हृदि नधृतिमुषोदृष्टि-"
"बाणाः पतंति ॥ १ ॥

असें आहे ह्मणूनच दुराचार न घडावा या अर्थीं पुरुषांस भार्या मेली असतां पुनर्विवाह करण्याचा विधि सांगितला. असें असतां स्त्रियांस तो विधि कां नसावा? स्त्रियांस तर

"स्त्रीणां द्विगुण आहारो बुद्धिश्चापि चतुर्गुणा साहसं षड्गुणं"
"प्रोक्तं कामश्चाष्टगुणो भवेत् ॥ १ ॥"

अतएव

"स्थानं नास्ति क्षणो नास्ति नास्ति प्रार्थयिता नरः ॥ तेन नारद ना-"
"रीणां सतीत्वमुपजायते ॥ १ ॥"

या प्रमाणें असलें तरी सद्विद्याभ्यास असता तर कांहीं तरी विवेक धरिला, तो तर या हिंदुस्थानांत नाहीं. हा एक मोठा दोष आहे. असें असतां त्या बिचाऱ्या तरी कसें काय करितील. विद्याभ्यास न करवण्यास मूळ असें दिसतें कीं, पुस्तकें पाहूं शकल्या ह्मणजे कोकशास्त्रादिक पाहून वाईट चाल धरून बिघडतील; परंतु, "विद्या ददाति विनयं" ह्मणून लहानपणापासून सद्विद्या, नीति वगैरेचा अभ्यास करविल्यास कधीं बिघडणार नाहींत. पहा कीं, युरोपियन लोकांमध्यें सर्व स्त्रियांस विद्याभ्यास पुरुषां प्रमाणेंच असतो. त्या कोणत्या बिघडल्या? हिंदुस्थानाच्या कोणत्या परिशुद्ध आहेत? बरेंवाईट सर्वत्र राहतें; परंतु त्यांमध्यें वाईट थोडें, येथें बरें थोडें, हें प्रत्यक्ष सिद्धच आहे. आणीक एक होतें कीं, त्यांजवळ्या गेल्या ह्मणजे हंसिनी जवळ बकिनी प्रमाणें होतात. यास्तव ...स जरूर करावा. या गोष्टीस निषेधही नाहीं. रुक्मिणीनें कृष्णास

पत्र श्लोकबद्ध लिहून ब्राह्मणाहातीं पाठविलें होतें. ही कथा श्रीमद्भागवतीं दशम स्कंधांत प्रसिद्ध आहे. तेव्हां पूर्वी चाल असतांही क्षुद्र दृष्टीनें मना केली असें स्पष्ट दिसतें. अस्तु, प्रकृतमनुसरामः॥ असे हें बालविधवाकृत दुष्कृत उघड पाहून जे लोक विचारवंत, पापभीरु, लोकहितेच्छू आहेत, त्यांनीं पुनर्विवाहविधि चालविल्यावांचुन हा दुराचार मिटणार नाहीं. असें विचारून त्या विधीकरितां प्राचीन संमति घेऊन बहुत लिहिलें. असें पूर्वी सवाई जयसिंगाचे वेळेस व त्याचे आलीकडे पुण्यास परशुराम भाऊ पटवर्धन, कलकत्यास राममोहनराय हे आदिकरून बहुतांहीं वादविवाद चालविला. परंतु विचारवंत थोडे, गतानुगतिक बहूत, याजकरितां तो विचार तसाच राहिला. त्याचे आलीकडे शके १७५९ इसवी सन १८३७ या सालीं मुंबईंत एक किताब छापिली. त्याचे लिहिणार दोघे, एक तैलंग ब्राह्मण, दुसरा परशुराम क्षेत्रस्थ ब्राह्मण; त्या किताबा सर्वत्र गेल्या. त्याजवर एक धर्मशास्त्री यांणीं दूषण लिहिलें तें मुंबई दर्पणांत* छापिलें. त्याजवर परशुराम क्षेत्रस्थ यांणीं कटु लिहिलें. तीं दोन्हीं पाहून तैलंग ब्राह्मण याणें कटु लिहावयाचें कारण नाहीं, ह्मणून दोघांचें समाधान करून युक्तीयुक्तीनें आपलें मत स्थापिलें, हें सर्व दर्पणांत छापिलें आहे. तें सर्व पाहून एका मध्यस्थानें साधकें बाधकें विस्तार पूर्वक लिहून अक्षतयोनि स्त्रियांचा पुनर्विवाह करावा असें तैलंग ब्राह्मणाचेंच मत स्थापिलें; त्यांत फळेंही दाखविलीं. ह्मणून ती किताब विस्तृत आहे, यास्तव दर्पणांत समावेश न होय ह्मणून छापिली नाहीं. वेगळीही छापिली गेली नाहीं; परंतु कांहीं प्रति लिहवुन धर्मशास्त्री वगैरे यांजकडे पाठविल्या. त्याजवर पुन्हा कोणी दूषण दिल्हें नाहीं. तेव्हां सर्व संमतीच दिसली परंतु संमति घेऊन लिहिलें न होतें. त्या नंतर या सालांत मुंबई अखबारामध्यें पुनर्विवाह करण्याविषयीं सरकार चित्त पुरवीत आहे यास्तव हिंदुस्थानांतील नेटीव लोकांहीं बालविधवांस कामोत्पत्तीच न व्हावी अशा मात्रा करून ठेवाव्या, असें थट्टेप्रमाणें लिहिलें होतें. परंतु त्यांत पंडित लोकांनीं पाहायाजोगी हांसल गोष्ट एकही न होती. अशी ही

* त्या वेळीं मुंबईत निघणारें वर्तमानपत्र. हें प्रथम वे. शा. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर व मागून रा. रा. भाऊ महाजन हे चालवीत होते.

चर्चा स्तब्ध झाल्याप्रमाणें होती. सांप्रत नागपुरीं एक भरंवशीक गृहस्थाचे पदरचा पंडित यानेंही हा दुराचार पाहून अनुतापानें एक किताब लिहिली. त्यांत प्राचीन ग्रंथस्थवचनें व युक्ती प्रयुक्ती चांगल्या लिहिल्या आहेत ती किताब पुण्यास छापणार* आहेत. ही किताब एक आणि मध्यस्थांनीं लिहिलेली एक. अशा दोन्ही छापडून त्या किताबा सर्वत्र पंडितांकडे पाठविल्यास, श्रीभगवान् त्यांना बुद्धि देऊन संमत करवील ह्मणजे हें कार्य सिद्धीस जाईल. अशी आह्मास आशा आहे. सर्व पंडितमंडळीस आमची प्रार्थना हीच कीं, पाहा सर्वत्र दुराचार सर्वांस दिसत असतांही कोणी मिटविण्याचा उद्योग करीत नाहींत. जो करितो त्याला सहायही करीत नाहींत. हें आश्चर्य आहे. भगवंतानें विवेक दिल्यासारखा लोकोपकाराचा विचार करावा यांतच कीर्ति आणि सुकृत आहे. गतानुगतिकत्व करूं नये. सर्वांतही त्या किताबा मागवून आद्यंत चांगला पाहून एक मत होऊन संमति द्यावी. ह्मणजे लोकोपकार मोठा होऊन त्याचें श्रेयही मिळेल.

कोतिभारः समर्थानां किं दूरं व्यवसायिनां ॥ को विदेशः सुविद्यानां कः परः प्रियवादिनां ॥ १ ॥ कर्त्ता कारयिता चैव प्रेरकश्चानुमोदकः ॥ सुकृतं दुष्कृतं चैव चत्वारः समभागिनः ॥ अलमिति पल्लवितेन ॥ श्रीरस्तु शके १७६२ फाल्गून कृष्ण पंचमी तारीख १२ माहे मार्च सन १८४१ इसवी. ॥ ॥ ॥

प्रस्तावना समाप्त.

---

# पुनर्विवाहप्रकरण.

अथ पुनर्विवाहप्रकरणं ॥ परोपकार व्हावा व अन्यायाचरण न व्हावें या विषयीं शास्त्राधार व युक्ति यथामति मिळविली ती विचारवंत जे उत्तम जन त्यांस निवेदन करितों ॥ आशा हीच कीं, याचा सदसद्विचार व्हावा ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आदिकरून ज्या ज्या जातीमध्यें बाल्यावस्थे पासून वृद्धावस्थे पर्यंत कोणत्याही काळीं स्त्रियेस वैधव्य प्राप्त झालें

---

* हें पुस्तक छापलें जाऊन हल्लीं त्याची एक प्रत नागपूर मुक्कामीं एका ज्या संग्रहीं आहे असें एका मित्रांकडून समजण्यांत आलें आहे.

असतां पुनर्विवाह करीत नाहींत, त्या त्या जातींत हें मोठें अज्ञान व अनर्थास मूळ ॥ ते अनर्थ कोणते ॥ प्रथम तर, विधवा कन्येचें जीवित व्यर्थ ॥ कांकीं जीवंत्योपि मृता इव ॥ दुसरा ॥ व्यभिचार फार होतो॥ कारण कामाजयत्वात् ॥ तिसरा, बालहत्या गर्भपातादि बहूत होतात. चौथा, माता पिता सासू सासरे इत्यादि आप्त लोकांस यावज्जीव शल्य राहतें. पांचवा, तिचें संगानें अन्य स्त्रिया जीवद्भर्तृकाही दुष्ट कार्यास प्रवृत्त होतात. असे बहुतेक अनर्थ घडतात! असें असून पुनर्विवाह कां करीत नाहींत. सांप्रत कलीमध्यें शास्त्राधार नाहीं ह्मणावें तर ग्रंथप्रमाण मुहुर्तमार्तंडांत लिहिलें आहे. **देयान्यत्र विवाहितापि च बलाद्या विद्धयोनिर्नचेत्** ॥ ह्मणजे अक्षतयोनि कन्येस वैधव्य झालें असतां अन्यत्र स्थलाचे ठायीं द्यावी. दुसरें प्रमाण लघुपाराशरी स्मृतींत सांगितलें आहे ॥ अध्याय तिसरा ॥ नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ॥ पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ १ ॥ कारण कलींत पाराशरींचेंच वाक्य प्रबळ आहे याविषयीं प्रमाण, बृहस्पति ॥ कृते तु मानवा धर्मास्त्रेतायां गौतमः स्मृतः ॥ द्वापरे शंखलिखितौ कलौ पाराशराः स्मृताः ॥ १ ॥ व याजवर माधवांनीं टीका केली त्यांत संग्रह श्लोक ॥ यस्तूढायाः पुनरुद्वाहो यमशातातपाभ्यां दर्शितः ॥ वरश्चेत्कुलशीलाभ्यां न युज्येत कदाचन ॥ न मंत्राः कारणं तत्र न च कन्यानृतं भवेत् ॥ १ ॥ समाछिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकां ॥ पुनर्गुणवते दद्यादिति शातातपोऽब्रवीत् ॥ २ ॥ हीनश्चेत्कुलशीलाभ्यां हरेत्कन्यां न दोषभाक् ॥ न मंत्राः कारणं तत्र न च कन्यानृतं भवेत् इति ॥३॥ कात्यायनोपि ॥ स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एव च ॥ विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोपि च ॥ १ ॥ ऊढापि देया सान्यस्मै सप्रावरणभूषणेति ॥ मनुरपि ॥ नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ॥ पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते॥ १॥ आतां टीकाकार मात्र आपले युक्तीनें निषेध लिहितो, परंतु पराशरी मूळांत हा भाव नाहीं॥ व मूळ तेंही कठीण नाहीं. आतां टीकाकार वचन ॥ सोयं पुनरुद्वाहो युगांतरीय विषयः॥ तथा च आदिपुराणे ॥ ऊढायाः पुनरुद्वाहं ज्येष्ठांशं गोवधं तथा ॥ कलौ पंच न कुर्वीत भ्रातृजायां कमंडलुमिति ॥ परंतु हें वचन टीकाकारांनीं ग्रथांतरीचें घेतलें ॥ तसेंच कन्या दोषही सांगितले ॥ तो प्रकार॥ पत्रे साहा दुसरे अध्यायांतील

लिहून पाठविली आहेत, याचा विचार करावा॥आतां पुढें मर्यादा लिहि-
ली कीं, वाग्दानापासून सप्तपदीपर्यंत॥ परंतु हें पराशर महाराजांस संमत
नाहीं॥ कारण कीं, युगांतरीय विषय लिहिला हो गोष्ट असंगत ॥कशी॥
अहो त्या युगांत तुह्मी लिहितां कीं, तपोमय प्राण ॥ इंद्रियनिग्रहसामर्थ्य॥
व देवरादिसुतोत्पत्ति॥ हे प्रकार बहुत आहेत॥त्यास त्या युगांत विवाह करणें
नसतें तरीं इतका अनर्थ न होता॥ कां कीं,तपसामर्थ्येंकरून निग्रह करून
सत्काळक्षेप करित्या, तर होऊं शकतें ॥ तुह्मी सांगितलें कीं, सर्व ग्रंथीं॥
कलींत लोक दुष्टाचरण करितील व शिश्नोदरपरायण होतील व स्त्रिया
दुष्ट होतील॥त्यांस हा विवाहाधिकार असता तर दुष्टाचरण केल्यास दंडा-
स योग्य होत्या ॥ कारण क्षुधित पुरुषानें अन्न मिळालें नसतां
अभक्ष भक्षिल्यास दंड नाहीं ॥ कारण क्षुधा सहन मोठ्या मोठ्यांस
होत नाहीं, तेव्हां प्राकृत पुरुष करितील हें कठीण ॥ या विषयीं
स्कंदपुराणीं इतिहास ॥ कोणे काळीं अनावृष्टि बहुत काळ झाली असतां
अन्न न मिळे तेव्हां विश्वामित्रानें फार क्षुधातुर होऊन चांडाळाचे
येथील कुतरा रात्रीं चोरून तो मारून पक्व केला व वैश्वदेव नैवेद्य करण्या-
विषयीं तो उद्युक्त झाला ॥ तेव्हां देवांनीं येऊन निषेध केला, व वृष्टि
करविली, तेणें करून धान्य झालें ॥ सारांश क्षुधा असह्य आहे ।
जो कोणी तृप्त असून गवादि अभक्ष पदार्थ लोभवशात् खाईल त्यास
दंड ॥ तसाच कामही दुःसह आहे व स्त्रियांस तो विशेष ॥ या विषयीं
इंद्रवरांत षष्टस्कंधीं भागवतीं आहे ॥ तेव्हां युगांतरीय विषय लिहिणें
हें अधर्म बीजारोपण करणें होईल ॥ हें समजून पराशरांनीं
कर्तव्यतेविषयीं मनूचाच संग्रह केला ॥ तो पाराशरी स्मृतीचा तिसरा
अध्याय संपूर्ण मूळ लिहून पाठविला आहे ॥ कारण ॥ टीकेंत वाग्दा-
नानंतर सप्तपदीचेपूर्वी असें लिहिलें आहे ॥ ह्मणून मूळांत तर हें
वाक्य नाहीं ॥ जर सप्तपदि नंतर विवाह निषेध असता तर मूळांत
नष्टेमृते हा श्लोक लिहून नंतर विवाहकाळ लिहिला असता ॥
तेथें तर पूर्वी विवाह काळ नियत लिहून नंतर तो श्लोक लिहिला ॥
तेव्हां सप्तपदी नंतरही पुनर्विवाह करावा हाच निश्चय ॥ असा पाराशरी
स्मृतीचा व मार्तंड ग्रंथांचा आधार आहे तो प्रशस्ततर ॥ आतां अक्षत
योनित्वाचा कालच मार्तंडांत श्रेष्ठ व शातातपांतही तोच काळ आहे

अन्य काल नाहीं. वचनें मात्र आहेत.॥ आतां अक्षत योनि असें जेव्हां लिहिलें तेव्हां सप्तपदी नियम वृथाच आहे॥कारण सप्तपदी नंतर क्षतयोनिविधि ॥ सप्तपदीचे पूर्वी क्षतयोनिविधि नाहीं ॥ तेव्हां विवाह करण्यास निषेध नाहीं॥आतां आपत्तिकाल प्राप्त जाला असतां मर्यादा नाहीं अशी सर्व शास्त्र संमति आहे॥आपद्धर्मांत सांगितलें आहे कीं स्त्रीला प्रसूती नंतर दाहा दिवस सूतक मर्यादा॥परंतु मध्यंतरीं वायुविकार जाल्यास आपत्ति जाणून मंत्रे करून शुद्धि करावी॥व ब्राह्मण स्त्रीनें शुचिर्भूत राहावें. परंतु त्या कालीं त्याचा प्रत्यवाय नाहीं॥तसेंच पुरुषास रोगादिक जाले असतां स्नानादि धर्म आरोग्य पर्यंत वर्ज असे बहूत प्रकार आहेत ते विद्वज्जनांचे लक्षांतच आहेत तेव्हां ह्या आपत्ति स्त्रियांसही आहेत ॥ त्यांचे निर्वाहार्थ ग्रंथकारांनीं संमत दिलें. आतां कोणी शंका करितील कीं, दोहोंच ग्रंथांत आहे॥त्यास हें तर खरें; परंतु जर सयुक्तिक वचन बालाचें असलें तरी ग्रहण करावें॥प्रमाण॥

युक्तियुक्तं वचोग्राह्यं बालादपि सुभाषितं ॥ हे ग्रंथकर्ते तर महान् आहेत. यांचें वाक्य व तें सयुक्तिक ॥ जसें पृथिवीचें फिरणें याविषयी आर्यभट्टाचें एक मत परंतु गुरुत्व तारतम्यें करून सयुक्तिक जाणून ग्रहणास योग्य तसें हेंही ग्रहणास योग्य॥आतां अक्षतयोनीविषयीं कोणी शंका करितील कीं कितीएक क्षतयोनि होऊन लोभामुळें गोपन करितील तर प्रसवकाळ नियत जाल्यास त्यांच्यानें गोपन होणार नाहीं व युक्तीसही नीट आहे कीं स्त्रियांस विश्रांति दोन॥एक पति,दुसरी संतति॥त्यास प्रसूतिकाळ नियत जाल्यास गोपन करणार नाहींत व त्याला विश्रांतीही होईल॥आतां शंका करितील कीं संतति नष्ट झाल्या नंतर पति मेला तर काय करावें? त्यासही ती प्रारब्धाची पराकाष्ठा ॥ येथें मनुष्योपाय काय? परंतु असें क्वचित्॥आणखी एक राजे लोकांची शिक्षा असल्यास अक्षत काळही लपवूं शकणार नाहींत ॥ परंतु हें शास्त्र पडलें ह्मणून नियमित काळ किंवा युक्तिकाळ यांत विचार करून जो उत्तम दिसेल तो करावा ॥ या विषयीं आग्रह नाहीं ॥ आतां पुनर्विवाह न करण्याच्या ज्या ज्या शंका पुढें लोक घेणार त्यांचे यथामति प्रकार लिहितों॥ प्रथम ईश्वर सृष्टींत स्त्रीपुरुष समान ॥ तेव्हां पुरुषानें पुनर्विवाह करावा आणि स्त्रियांहीं न करावा हें ठीक नाहीं॥ ईश्वरास दोन्हीं समान॥

जर ईश्वरेच्छा नसेल अशी शंका कराल तर हें संभवत नाहीं॥ जेव्हां मन्वादिकांहीं वचन लिहिलें आहे तेव्हां ईश्वरेच्छा आहे हें खरें॥ कारण ते ईश्वराच्या विभूति होत ॥ स्त्रियांस काम विशेष नसता तर ईश्वरेच्छाही नसती॥दुसरी शंका कराल कीं, पुरुष कांहीं स्त्रीगोत्रांत लागत नाहीं अतएव पुरुषांनीं विवाह करावा व स्त्री पुरुषाचे गोत्रांत लागते तेव्हां विवाह पुन्हा कसा होईल॥याचा खुलासा सयुक्तिक व सशास्त्र लिहितों. अन्य गोत्रींचा पुरुष असतां दुसरे गोत्रांत दत्तविधान जसें होतें, तसें पुर्वीं ज्या गोत्रांत स्त्रीचा विवाह झाला त्या गोत्रांतील बंधु पक्ष गोत्रपुरुषांसी तिला विवाह करणें नीट आहे ॥ जर त्या गोत्रांत कोणी नाहीं तर दुसरे गोत्रींच्या पुरुषाशीं विवाह करावा॥दुसरी शंका॥अहो कन्येचें दान होतें तेव्हां एकदां जो पदार्थ दान झाला तो पुन्हा दान कसा होईल? त्यास समाधान ऐका॥अचेतन पदार्थाचा ग्रहण करणारा मरणादि आपत्ति पावला असतां दुसरे त्याचे पुत्रादि त्या पदार्थाचे उपभोगास योग्य होतात व त्या पदार्थाची हानिही नाहीं. कारण अचेतनत्वात्॥ आतां स्त्रियादिक चेतन पदार्थ व दुसरा या पदार्थाचे उपभोगास समर्थ नाहीं. हें समजून मन्वादिकांनीं ज्या पक्षीं पुनर्विवाह करावा ह्मणून लिहिलें तेव्हां दानाविषयीं किमपि बाध नाहीं. कारण पूर्व युगांत दानप्रतिग्रहव्यवस्था या युगा पेक्षां फार लिहिली, तरी पुनर्विवाह विधीचें ग्रहण केलें. तेव्हां त्यांहीं समजूनच ग्रहण केलें आहे. तेंच पराशरानें कलींत ग्रहण केलें॥ आतां पाराशरींत तुह्मी शंका कराल कीं पुनर्विवाह प्रशस्त असता तर विवाहाचे श्लोकानंतर स्त्रीनें ब्रह्मचर्य करून राहावें व पितृगृहीं राहावें असें न लिहितें॥यास हें तों नीटच आहे;परंतु पुरुष स्त्रीस साम्यता कशी ह्मणाल तर पुरुषांनींही जसें एकपत्नी राहावें, ब्रह्मचर्य आचरावें, ह्मणजे ऋतुगामी असावें, हा उत्तम पक्ष ॥ व प्रथम स्त्री नष्ट झाली नंतर काम सहन न जाल्यास दुसरा विवाह करावा. तसेंच स्त्रीनें एक भर्ता नष्ट झाल्यावर काम सहन जाल्यास ब्रह्मचर्य आचरावें ॥ सहन न झाल्यास पुनर्विवाह करावा॥ कारण दुष्टाचरण न व्हावें ॥ आतां ज्या ज्या ग्रंथकारांनीं निषेध केला ते काय मूर्ख होते असें ह्मणाल तर मूर्ख नव्हते॥ याविषयीं लिहितों॥पूर्वीं हा प्रकार फार होता॥असा कीं, पूर्वी तपाचे सामर्थ्यें करून अल्पापराधास बहुत दंड, शाप, कोप वगैरे करीत होते व एकाचे

अपराधास्तव बहुतांस दंड करीत होते व ग्रंथ करण्याचें सामर्थ्य असलें तर निग्रहवाक्य टाकीत होते॥याचा प्रकार टीकेच्या दुसऱ्या अध्यायांतील वचनें लिहून पाठविलीं आहेत त्यांत सविस्तर लिहिला आहे॥कण्वेत्यादि॥ सांप्रत किती एक दुष्ट चाली किती एक जातींत चालल्या आहेत, त्या अशास्त्र असतां सामर्थ्यवान् पुरुषाचे सत्तेकरून होतात व चालतात व किती एक प्रकारचे सुज्ञ प्रभु राजे झाले असतां त्यांचा विचार करून त्या चाली मोडीत होते ॥ त्यांचा विस्तार लिहितों ॥ एकाचे अपराधानें बहुतांस दंड ते कोणते ॥ श्री भागवतांत नवम स्कंधीं वर्णिलें आहे कीं, ईश्वर पार्वती वनांत क्रीडा करीत असतां किती एक ऋषि तिकडेस गेले तें पाहून क्रीडाभंगकोपें त्यांनीं शाप दिला कीं, आज पासून जो कोणी पुरुष या वनांत येईल तो स्त्री होईल ॥ या वर सुद्युम्न नामक राजा त्या वनांत जाऊन स्त्री झाला त्याचा विस्तार फारच आहे ॥ सारांश हा आहे कीं, त्याचा अपराध नसतां तो दंड पावला ॥ व थोड्या ऋषींचे जाण्यानें सर्व पुरुषांस शासन घडलें हें अनुचित. दुसरें, महाभारतीं शोकपर्वीं कर्णाचे क्रियेचे वेळेस युधिष्टिरांनीं सर्व स्त्रियांस शाप दिला तो असा. अहो भवत्या मंत्रस्य गोपनेन वयंहताः पापेनासौ मया श्रेष्ठोभ्राताऽ ज्ञानान्नि पातितः ॥ १ ॥ अतो मनसि यद्गुह्यं स्त्रीणां तन्न भविष्यति। इत्युक्त्वा स तु गंगांभ उत्ततारा कुलेंद्रियः ॥ २ ॥ अहो अपराध कुंतीचा आणि शाप सर्व स्त्रियांस हें अनुचित ॥ एकाचे अर्थीं बहुतांस दंड तसेंच जो निषेध लिहितो त्याचा अपराध कोणी एके स्त्रीनें केला असेल परंतु तितक्यानें सर्व स्त्रियांस दंड वाक्यें लिहिलीं तर हें नीट नाहीं ॥ ज्याचा अपराध त्यासच दंड असावा, सर्वांस नसावा ॥ आतां थोडे अपराधास विशेष दंड तो प्रकार लिहितों. श्री भागवत दशम स्कंधीं सांगितलें आहे कीं, नृगराजा बहूत दान करीत असतां एके दिवशीं ब्राह्मणास दिलेली गाय रानांतून गोसमुदायांत आली तें राजानें न जाणून पुन्हा दुसरे ब्राह्मणास तिचें दान केलें. नंतर पूर्व दिवशींचा जो ब्राह्मण तो शोध करितां वळखून माझी गाय ह्मणाला आणि त्या दोघांचा विवाद होऊन राजापाशीं गेले. नंतर राजानें उभयतांस फार समजाविलें, परंतु त्यांनीं न ऐकून क्रोधें करून राजास ककलास हो असा शाप दिला. दुसरें सनकसनंदादि वैकुंठीं गेले.

तेव्हां जयविजयांहीं मना केलें ॥ तो त्या द्वारपाळांचा धर्मच ॥ परंतु तित-केच अपराधावर हे राक्षस जन्मतील असा सनकसनंदांनीं शाप दारुण दिला ॥ तसेंच प्रजेस पीडा निरर्थक द्यावी असा प्रकार पूर्वीं बहुत होता. आतां शास्त्र नसतां जातीमध्यें कोणी श्रेष्ठ झाले त्यांनीं अशास्त्र आपले सत्तेनें चालविलेले दुष्ट प्रकार लिहितों. पंचगौडांत नागरभेद खेडाव-ळ जातींत चालत आहे तो प्रकार ॥ कोणी वडील मेला असतां त्यांचे सुतका मध्यें अन्य ज्ञातिसमुदायांनीं त्याचे घरीं भोजन करावें. सूत-कांत त्याविषयीं निषेध असतां चाल अद्याप पर्यंत आहे ही कोणी निर्माण केली हें कळत नाहीं.मोडलेली वाईट चाल तीही लिहितों॥ पूर्वीं नागरांचे जातींत मृतकाचे बारावे दिवशीं किंवा अकरावे दिवशीं त्यांचे घरीं ज्ञातीनें भोजन करावें अशी रीति होती. नंतर एक जण नागर जातींत प्रबळ झाला त्यानें ती चाल मोडली. ही गोष्ट नागर वडनगरे यांचे मुखांतून श्रुत आहे. आतां किती एक राजे लोकांनीं जुन्या चांगल्या चाली मोडून शास्त्र नसतां नव्या केल्या व कित्येकांनीं जुन्या वाईट चाली मोडल्या त्यांचा विस्तार लिहितों. जयपूर वगैरे प्रांतांत मुख्य राजा-ची स्त्री अथवा माता मेली असतां सर्व प्रजेचें क्षौर बलात्कारें करून करावें अशी चाल आहे. हें अशास्त्र व युक्तीस नीट नाहीं. तसेंच हिंदु-स्थानांत रजपूत लोकांत एक जातिभेद आहे त्यांत कोणास कन्या प्रस-वली असतां तात्काळ ठार मारावी अशी त्यांनीं चाल घातली होती. तेथें कंपनी सरकारचा अंमल झाल्या पासून ती चाल मोडली. त्यास असें आहे कीं, प्रभु सुज्ञ असले तर चांगली नवी चाल करितात व जुनी वाईट चाल मोडितात आणि प्रभु अज्ञ असले तर जुनी चांगली मोडून भलतीच नवी चाल करितात. तेव्हां ही चाल कोणी प्रभु अज्ञान व त्याजवळचे पंडीत स्त्रीद्वेषी असतील त्याजमुळें मोडली गेली, परंतु चांगला विचार न केला असें कल्पनेनें वाटतें. कारण सवाई जयसिंगांनीं पुनर्विवाह चालविण्याचा उद्योग केला असतां कोणी त्याचे आईस सांगितलें कीं, हें न करावें, तेव्हां ती आप-ले पुत्रास ह्मणाली पहिल्यानें माझा विवाह करा, नंतर रूढी चालू करा त्याजवरून तो स्तब्ध राहून त्यानें तो उद्योग सोडला. जर त्यानें मातुश्रीस उत्तर केलें असतें कीं, तूं ह्मणतेस हें खरें परंतु पुत्रवतीनें

विवाह न करावा, त्यास तुझी अशी इच्छा आहे तर तूं मला मार नंतर विवाह कर॥ तरे ती स्तब्ध होती व ती गोष्ट साध्य होती. त्यास सांप्रत कंपनी सरकार बहादुर तो पथ प्रवर्तविण्यास उद्युक्त आहेत. जे गुणग्रहणकर्ते व प्रजेस उपद्रव न व्हावा, प्रजांचें पुत्रवत पालन करावें इकडे ज्यांचें लक्ष्य, असे जे हे बाहादूर यांची राजनीति पाहून हा निश्चय समजला कीं, आह्मीं जो हा प्रकार लिहिला आहे तो यथाशास्त्र व यथायुक्ति आहे. याचा विचार होऊन युक्ति नीट असल्यास सदरेंत लेख जाऊन उद्योग होऊन सतीचे निषेधा सारिखें सिद्ध होईल असा निश्चय समजून लेखनांत आलें. आतां पुढें जें जें वाक्य लिहिलें ते ते ग्रंथ पाहावे. व फार विस्तार लिहावा तर पुस्तकें येथें लवकर मिळत नाहींत. कारणापुरतें वाक्य मोठ्यां मोठ्यांचें आहे. पुरुषांनीं बहूत विवाह करावे व स्त्रियांनीं न करावे हें योग्य नाहीं. ईश्वरसृष्टींत दोन्ही समान-आहेत. पूर्वीं तर एका स्त्रीस बहूत पति जीवंत असे होते॥ ते कोण म्हणाल तर पांडव पांच मिळून द्रौपदी एक स्त्री.प्राचेतस दाहा मिळून एक स्त्री असे होते ॥ तेव्हां एक मेला अथवा आपत्तिग्रस्त झाला असतां निषेधच नाहीं. आतां मुंबईचे छापखान्यांत लिहिलें कीं प्रौढ स्त्री झाल्या-नंतर विवाह करावा हें नीट. परंतु ऋतु प्राप्त झाल्यानंतर विवाह ठीक नाहीं. कारण जे अकरावे वर्षापासून कामज्ञान होतें. तेव्हां सातवे आठवे वर्षापासून दहा वर्षांपर्यंत नियत असावा ॥ नंतर प्रौढ दशेमध्यें लिहिल्या आपाचि झाल्यास पुन्हा विवाह करावा. केवळ दोन तीन वर्षांचे-ही मुलींचें लग्न करणें निषिद्ध. कारण आठां वर्षांपर्यंत यथा क्रमें करून सोम गंधर्व आणि अग्नि असे पति होऊन नंतर मनुष्य होतो व फार वय झाल्यावर रजपूत व मुसलमानासारिखें तीस तीस चाळीस चाळीस वर्षांनीं करणें हें नीट नाहीं. आतां विद्याभ्यासाविषयीं लिहिलें तें नीट आहे. अभ्यास न करण्याचें कारण व करण्याची युक्ति यथाश्रुत लिहिली आहे. त्या युक्तीनें केल्यास रूढी चालूं लागेल व अभ्यास करितील ॥ परंतु केवळ विद्याभ्यासें इंद्रियनिग्रह करितील असें वाटत नाहीं. कारण काय याजविषयीं लिहितों ॥ असिशब्देन कृत्वा भयकंपादिर्जायते न तु प्राणवियोगः अथवा मोदकशब्देन कृत्वा किंचित् क्षुधानिवृत्तिः न तु उदरपूर्तिः ॥ तसेंच विद्याभ्यासें विवेकवति बहूत होतील

परंतु केवळ कामजय सर्व करितील असें होणार नाहीं. याविषयीं स्त्रीपुरुषांत प्रमाण॥ विश्वामित्रपराशरादिमुनयोवातांबुपर्णाशनास्तेपिस्त्रीमुखपंकजंसुललितंदृष्ट्वैव मोहं गताः ॥ शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुंजंति ये मानवास्तेषामिंद्रियनिग्रहोयदिभवेद्विंध्यस्तरेत्सागरम्॥१॥दुसरें ॥मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नैकशय्यासनोभवेत्॥बलवानिंद्रियग्रामोविद्वांसमपि कर्षति ॥ २ ॥ ही मानवी पुरुषांची गोष्ट ॥ व देवादिकांमध्यें ब्रह्मा इंद्रचंद्रादिकांचीही स्थिति सर्वांचे लक्षांत आहे. आतां स्त्रियांविषयीं सांगतों.

* * * * * * *

ह्यास मोठ्या मोठ्या देव स्त्रियांची व ऋषि स्त्रियांची वृत्ति चंचल होती तेव्हां मानवी स्त्रियांचें काय आश्चर्य ॥ व सांप्रत स्थितिही प्रगट आहे कीं ज्या स्त्रिया विधवा झाल्या त्यांस मायबाप नसले व सासूसासरे नसले अथवा पोषण करण्यास असमर्थ जर ते असले तर त्यांचा मोठा नाश होतो. ज्या कोणी सुज्ञ आहेत त्या स्वयंपाक करणें अथवा भिक्षा मागणें इत्यादिक नीच वृत्ति करून आपलें पोषण करितात व ज्या दुष्ट त्या तर ** करून निर्वाह करितात व तें त्यांचें कर्म चांगलें प्रगट असून कोणी निवारण करित नाहींत ॥ आतां कोणी केवळ शास्त्रानें आग्रह करितील तर जें न करण्याचें आचरण व ते लोक विरुद्ध व अशास्त्र असलें करितात. हा प्रकार छापखान्यांत फार सविस्तर छापिला आहे व आपले लक्षांत आहे तेव्हां विशेष काय लिहावें? प्रगटच आहे. आतां कलींत निषिद्ध केले जे जे पदार्थ त्यांचा प्रकार व ते योग्यअयोग्य लिहितों. विवाहिताचा पुनर्विवाह, वडील भावास जेष्टांश, गोवध, भावाची स्त्री, व संन्यास. याचा प्रकार. जेष्ठांश लिहिला हें बरेंच आहे; दिला तरी बरें; नाहीं तरी बरें. यांत कांहीं हरकत नाहीं. गोवध निषेध केला हें चांगलें. यांचा तर सर्व युगांत निषेध पाहिजे. कारण दुसऱ्या प्राण्याचा अपराधा वांचून वध करून आपले कल्याणाची इच्छा करणें हें नीट नाहीं. याविषयीं विचार करून श्रीमंत विनायकराव यांनीं पिठपशु केला हें उत्तम. भ्रातृजाया कलींत निषिद्ध हें उत्तम. कारण पूर्वीं वंश नसल्यास तो प्रकार होता. त्यास ते अमोघवीर्य असें ग्रंथावरून वाटतें. तेव्हां वंशवृद्धि पुरतें ग्रहण करावें हें उचित्. सांप्रत अमोघवीर्य पुरुष नाहीं. तेव्हां संस्कारावांचून भावाचे स्त्रीशीं गमन करणें हें नीट नाहीं. आतां संन्यासाचा प्रकार लि-

होतो. आतुरास व पंनास साठ वर्षांचे आलीकडचे पुरुषांस संन्यास देणें हें निषिद्ध व तरुण पुरुषांनीं घेणें हें निषिद्ध. कारण कीं संन्यास घेऊन यथेच्छ व्यवहार करणें या पेक्षां निषेध करणें उत्तमत्र पक्ष होय. आतां जे पुरुष साठ वर्षांचे वरचे वयाचे कामशिथिल व ज्ञानसंपन्न आहेत त्यांनीं घेणें नीट आहे. त्यांनीं आश्रम घेऊन विचार संपन्न राहिल्यास चांगलें आहे ॥ तसेंच गोसावी लोक द्रव्य लोभ दाखवून पोर घेऊन त्यांस गोसावी करितात हें नीट नाहीं ॥ ते उभयतां भ्रष्ट होतात. ज्या जातींत संन्यास घेण्याचा अधिकार नाहीं, त्या जातीनें साठ वर्षांचे पलीकडे सत् ज्ञानाभ्यास करून गोसावी होऊन स्वधर्मानें रहावें हें उत्तम आहे ॥ नाहीं तर नीट नाहीं ॥ आतां पुनर्विवाहाचा कलींत निषेध लिहिला हें तों सर्वथा उत्तम नाहीं. ॥ कारण त्या युगांत पुरुष व स्त्रिया शुद्ध व ज्ञानवान् होत्या असें ग्रंथांवरून वाटतें ॥ तेव्हां त्या वेळेस निषेध असता तर अवघड नव्हतें ॥ आतां तर तुम्हींच लिहितां कीं, कलींत पुरुष व स्त्रिया दुराचारी व इंद्रियलोलुप होतील ॥ तेव्हां या निषेधानें तर उत्तरोत्तर अधिक होतील ॥ व शासनास जागा राहणार नाहीं ॥ कारण ज्या स्त्रिया पति, संनिध, बलवान, अनुकूल, असा असून दुराचरण करितील त्यांस दंड करणें हें उचित॥ परंतु ज्या तरुणी अशा विधवा आहेत त्यांनीं दुराचरण केलें असतां त्या दंडास योग्य नाहींत ॥ कारण पूर्वीं कोणे एकाचे राज्यांत एका गृहस्थाचे स्त्रीनें पति चिरकाळ देशांतरास गेला असतां व्यभिचार केला, ती गोष्ट प्रगट होऊन तिला धरून राजानें धर्माधिकारी यापाशीं पाठविलें कीं, ईस शासन काय करावें॥ तेव्हां तो पुस्तक अवलोकन करूं लागला. त्या अवसरांत धर्माधिकारी याचे कानांत कंडू उत्पन्न झाला. तेव्हां त्यानें शिष्यास सांगितलें कीं काडी आण ॥ त्याला कांहीं अवसर काडी आणण्यास लागला, तितक्यांत बोटांनीं कान खाजवूं लागला ॥ तेव्हां तिनें विनंती केली कीं, महाराज आपण ज्ञानसंपन्न असून इतकें काडी आणण्या पर्यंत धैर्य न झालें हें परम आश्चर्य ॥ कीं हातानें कान खाजऊं लागलां ॥ तेव्हां माझा पति पांच सहा वर्षे प्रवासास गेला, तेव्हां माझें धैर्य जाऊन थोडका अपराध झाला ॥ त्यास माझा अज्ञान स्त्रीचा अन्याय काय ॥ हें वचन ऐकून धर्माधिकारी फार प्रसन्न झाला ॥

आणि राजास सांगितलें कीं, इला पतिजवळ पाठविणें अथवा इचे नवऱ्यास इचे जवळ बोलाऊन आणणें हेंच योग्य ॥ ही दंडास योग्य नाहीं ॥ याजविषयीं मनूचें वाक्य प्रमाण॥ "अदंड्यान् दंडयन्राजा दंड्यांश्चैवाप्यदंडयन् ॥ अयशो महदाप्नोती नरकं चैव गच्छति ॥ १ ॥ तेव्हां राजानें तिचे नवऱ्यास बोलावून घेतलें. तेव्हां दंडास योग्य त्यास दंड हें राजास उचित् परंतु जे अदंड्य त्यांस दंड हें अयोग्य ॥ जितका अपराधी तितका दंड असावा विशेष दंड हेंही उचित् नाहीं. जसें पुण्यांत घाशीराम कोतवाल यानें ब्राह्मणास मक्याच्या कणसा करितां कोंडून मारिलें. तेव्हां ह्मण आहे कीं, कांकडीची चोरी आणि कटारीचा मार, तसें झालें. त्यासें विधवा स्त्रियांस विवाह न करणें हा फार दंड. त्यासही पुनर्विवाहाची गोष्ट राजे लोकांनीं केली असतां किंचित् काल अवघड वाटेल, परंतु मार्ग चालू झाला ह्मणजे सुलभ होईल व प्रजा सुखी होतील. यामध्यें लोकही प्रवृत्त होतील ॥ जसा अरण्यांत तस्करादि उपद्रवें करून जो कठिण मार्ग त्या मार्गाचा राजांनीं बंदोबस्त केला असतां पूर्वी दहा-पांच गेले ह्मणजे तोच सर्वांस मार्ग सुलभ होतो. तसा हाही सुलभ होईल यांत शंका नाहीं ॥ तर असें समजून यथामति प्रकार लिहिला आहे, व विवाह न करतां ज्यांहीं दुराचरण केलें असतां दंड शास्त्रतः निषिद्ध आहे ॥ प्रमाण ॥

**अमृते जारजः कुंडो मृते भर्तरि गोलकः** ॥ या वचनें करून शास्त्रांची अपेक्षा सर्वांस आहे ॥ दुसरें **ब्राह्मण्यां क्षत्रियाज्जात** इत्यादिक वचनें बहुत आहेत. परंतु ब्राह्मण स्त्रीचा पुनर्विवाह करणें स्वजातीमध्येंच उत्तम असें समजून लिहिलें ॥ कारण आपण पृथ्वीपति सार्वभौम व फार नितिज्ञ व शास्त्रज्ञ व विद्वज्जनसंग्रह करणार असें समजून केवळ परोपकारार्थ हा विचार यथामति व यथाशास्त्र लिहिला ॥ याचा चांगला विचार करणें ॥ जर आपल्यास उत्तम वाटेल तर दुसऱ्या लोकांस दाखवावें व उत्तम भासल्यास विचारास आम्हास सदरेतही पाठवावें व अवलोकना नंतर याचें उत्तर यावें हीच आशा दुसरें कांहीं नाहीं॥ अल्पमति विस्तरेण ॥ इति पुनर्विवाहप्रकरणं समाप्तं ॥ ॥